www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ७४ शनिवार, २२ नोव्हेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514





## मुकुंद कांबळे यांच्या रुग्णसेवेची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यालयाकडून दखल

### कृतज्ञ पत्र देऊन गौरव – सामाजिक कार्याला मोठा मान

**दैनिक युवक आधार**

**संपादक संतोष आमले** : समाजातील गरजू, असहाय आणि आपत्कालीन परिस्थितीत अडकलेल्या रुग्णांना वेळीच मदत करून निस्वार्थीपणे सेवा देणारे समाजसेवक मुकुंद कांबळे यांच्या कार्याची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयाने अधिकृत दखल घेतली आहे. त्यांच्या सततच्या सामाजिक बांधिलकीचे आणि रुग्णसेवेतील उल्लेखनीय योगदानाचे कौतुक म्हणून शिंदे यांच्या कार्यालयाकडून कृतज्ञ पत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले. या सन्मानामुळे पनवेल परिसरात सर्वत्र आनंद आणि अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. मुकुंद कांबळे यांनी गेल्या काही वर्षांत अनेक रुग्णांना तातडीची मदत उपलब्ध करून दिली आहे. गंभीर परिस्थितीत रुग्णालयात दाखल करणे, औषधांची सोय, गरजू कुटुंबांना आर्थिक मदत, आरोग्यविषयक मार्गदर्शन, रक्तदाते उपलब्ध करून देणे, तसेच आपत्कालीन वेळेस वाहतूक सुविधा – या सर्व माध्यमातून त्यांनी अनेक कुटुंबांना जीवनदायी साथ दिली आहे.




कृतज्ञता पत्र


त्यांच्या या सातत्यपूर्ण आणि नि:स्वार्थ कार्यामुळे शेकडो लोकांचे जीव वाचले असून अनेक कुटुंबांवर ओढवलेल्या संकटाचा भार हलका झाला आहे. उपमुख्यमंत्री कार्यालयाकडून मिळालेला गौरव हा मुकुंद कांबळे यांच्या अथक परिश्रमांचा आणि समाजाप्रती असलेल्या संवेदनशीलतेचा मोठा सन्मान मानला जात आहे. स्थानिक नागरिक, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, स्वयंसेवी संघटना, तसेच त्यांच्या मदतीचा लाभ घेतलेल्या अनेकांनी या गौरवाबद्दल मनापासून समाधान व्यक्त केले आहे. त्यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या सेवाभावी कामामुळे समाजातील इतरांनाही प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.मुकुंद कांबळे यांनी मात्र हा सन्मान संपूर्ण समाजाचा असल्याची भावना व्यक्त करत, "गरजूंना मदत करणे ही आपली मानवी कर्तव्य आहे. समाजाने दाखवलेला विश्वास आणि मिळालेला सन्मान मला आणखी जोमाने काम करण्याची ताकद देतो," अशी प्रतिक्रिया दिली. पनवेल परिसरात रुग्णसेवा, सामाजिक बांधिलकी आणि मानवतावादी मूल्ये जपणाऱ्या या कार्यकर्त्याच्या योगदानाचे कौतुक सर्व स्तरातून होत असून, हा सन्मान त्यांच्या सामाजिक कार्याला नवी ऊर्जा आणि दिशा देणारा ठरत आहे.

## मुंबईतील स्वच्छता विषयक 'सुविधा केंद्र' उपक्रम पथदर्शी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### ७.५ लाख नागरिकांना स्वच्छतेचे शिक्षण, ५.५ लाख नागरिकांनी घेतला सुविधा केंद्राचा लाभ

मुंबई : शहरी क्षेत्रातील स्वच्छता, पाणी-बचत आणि आरोग्य सुधारणा यासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधीमधून मुंबईत राबवण्यात आलेला 'सुविधा केंद्र' उपक्रम आदर्श मॉडेल ठरत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान गती घेत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत या अभियानात विविध संस्था जोडल्या जात आहेत.

हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संयुक्त भागीदारीत सुरू झालेल्या या उपक्रमाने अल्पावधीत मोठे परिणाम साधले आहेत. सध्या मुंबईत २३ केंद्रे कार्यरत असून, लवकरच २४ वे केंद्र सुरू होणार आहे. मुंबईत आणखी २ केंद्रे बांधकामाधीन असून ७ केंद्रांचे प्रस्ताव प्रगतीपथावर आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका, हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड, एचएसबीसी आणि जेएसडब्ल्यू फाउंडेशन यांच्या सहकार्याने



ही योजना पुढील काही वर्षांत अधिक विस्तारणार आहे.

शहरातील झोपडपट्टी आणि वंचित वस्त्यांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि परवडणाऱ्या स्वच्छता सुविधा देण्याचे उद्दिष्ट या केंद्रांमागे आहे. ५.५ लाख नागरिकांना आतापर्यंत याचा प्रत्यक्ष लाभ झाला असून, आरोग्यदृष्ट्यादेखील हे मॉडेल उपयुक्त ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सुविधा केंद्रे ही स्वच्छतेच्या शाश्वत व्यवस्थेचे महत्त्वपूर्ण घटक असून त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशात आणखी सुविधा केंद्रे सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत.

या प्रकल्पासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईसारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या महानगरात 'सुविधा केंद्र' मॉडेलने सार्वजनिक-खासगी भागीदारीतून उत्तम कामाचे उदाहरण निर्माण केले आहे. ही केंद्रे शहराच्या आरोग्यसुरक्षेत मोठे योगदान देत आहेत. या सुविधा केंद्रामध्ये उत्तम सुविधा, लोकसहभाग, वर्तणूक बदल, आर्थिक आणि पर्यावरण टिकाव आणि कार्यक्षम संचालन यावर विशेष लक्ष देण्यात आले आहे. हे सर्व अत्यंत उल्लेखनीय असून हा उपक्रम शहरी महाराष्ट्रासाठी आदर्शवत आहे.

**उपक्रमाची वैशिष्ट्ये**

**सुरक्षित आणि सन्मानजनक स्वच्छता**

झोपडपट्टी व अनौपचारिक वसाहतींतील महिलांसाठी सुरक्षित शौचालय, मुलांसाठी स्वच्छ जागा, दिव्यांगांसाठी सुलभ रचना — या सर्व बाबींमुळे सुविधा केंद्रे अत्यंत लोकाभिमुख झाली आहेत.

**पर्यावरणपूरक मॉडेल**

जल-बचत तंत्रज्ञान, ऊर्जा कार्यक्षमता आणि कचरा व्यवस्थापन यामुळे पर्यावरणीय शाश्वततेचा उत्तम नमुना तयार झाला आहे.

**समुदायातील महिलांचा सहभाग**

प्रशिक्षित ३०० महिलांनी राबवलेल्या वर्तनबदल मोहिमेमुळे ७.५ लाख नागरिकांना स्वच्छतेचे शिक्षण मिळाले. यामुळे नागरिकांच्या सवयी, वापर आणि आरोग्य-जाणीवेत सकारात्मक बदल घडला.

**आरोग्यदायी परिणाम**

'सुविधा केंद्रां'मुळे जठरांत्र, अतिसार आणि मूत्रमार्गाच्या संक्रमणात ५० टक्के घट झाली आहे. झोपडपट्टी क्षेत्रातील सर्वाधिक समस्या असलेल्या दूषित पाणी व अस्वच्छतेमुळे होणारे आजार आता लक्षणीयरित्या कमी झाले आहेत.

**आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण मॉडेल**

सुरुवातीपासून ९ महिन्यांत केंद्र स्वतःचा खर्च भागवू लागते ही या योजनेची मोठी ताकद आहे. आज मुंबईतील सर्व २३ केंद्रे पूर्णपणे स्वयं-टिकाऊ आहेत.

## व्रतवैकल्यांचे मांगल्य घेऊन आला मार्गशीर्ष महिना

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : मार्गशीर्ष हा भारतीय पंचांगानुसार मराठी महिन्यातील नववा महिना आहे. यालाच 'अग्रहायण' किंवा 'अगहन' असे म्हटले जाते. हा महिना ३० दिवसांचा असतो. हा महिना सर्वोत्तम असा आहे. ज्याप्रमाणे श्रावण महिना भगवान शिवाला समर्पित आहे कार्तिक महिना भगवान विष्णूला समर्पित आहे. त्याचप्रमाणे मार्गशीर्ष महिना भगवान श्रीकृष्णाला समर्पित आहे. प्राचीन धार्मिक ग्रंथानुसार मार्गशीर्ष महिना धार्मिक कार्यासाठी विशेष मानला आहे, म्हणून हा महिना अतिशय शुभ मानला जातो .या महिन्यापासून सत्ययुग सुरू झाले असेही म्हटले जाते ,यामुळे या महिन्यात शुभकार्य अधिक फलदायी ठरते.मार्गशीष महिन्यात अनेक वृतवैकल्य केली जातात. ज्यात भगवान



श्रीकृष्णाची पूजा ,पवित्र नद्यांमध्ये स्नान आणि मार्गशीर्ष गुरुवारचे व्रत विशेष महत्त्वाचे आहेत. या महिन्यात महालक्ष्मीचे व्रत आणि उद्यापन करणे तसेच या महिन्यातील पौर्णिमा आणि दत्त जयंती सारखे सण उत्सव साजरा करणे शुभ मानले जाते. मार्गशीर्ष गुरुवार या महिन्यातील अनेक स्त्रिया महालक्ष्मीची पूजा करून व्रत करतात ज्यांचे उद्यापन शेवटच्या गुरुवारी केले जाते. या महिन्यातील गुरुवारी महालक्ष्मीचे व्रत आणि पूजा केली जाते. त्यामुळे सुख समृद्धी येते तसेच या महिन्यात पवित्र नद्यांमध्ये स्नान करणे अत्यंत शुभ मानले जाते. रोज सकाळी आणि संध्याकाळी तुळशीची पूजा करून तुपाचा दिवा लावणे हेही फार महत्त्वाचे आहे. भगवान श्रीकृष्णाची ची व विष्णुंची पूजा मार्गशीर्ष महिन्यात करणे विशेष फलदायी मानले जाते .या महिन्यात केलेले जप तप आणि दान पुण्य अधिक फलदायी ठरतात .तसेच हा महिना विवाह, मुंज आणि गृहप्रवेश सारख्या शुभकार्यासाठी देखील चांगला मानला जातो.

मास, मदिरा ,लसूण आणि जिऱ्याचे सेवन या महिन्यात टाळावे त्याचप्रमाणे इतरांची निंदा किंवा चुगली करणे ही टाळावे.असे सांगितले जाते. त्याचप्रमाणे महाभारताच्या अनुशासन पर्वाच्या अध्यायात असे म्हटले आहे की मार्गशीर्ष महिन्यात मनुष्याने एक वेळ भोजन करावे .असे करणारे व्यक्ती सर्व रोग व पापांपासून मुक्त होतात. जर एखाद्या व्यक्तीने महिन्यात उपवास केला तर तो निरोगी होतो .असा उल्लेख देखील पुराणात मिळतो. अन्नदान कोणत्याही महिन्यात करणे उत्तम मानले जाते. पण या काळात त्याला जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे या महिन्यात अन्नदान केल्याने माणसाची मनोकामना पूर्ण होते. मार्गशीर्ष महिन्याबद्दल ही दिलेली विशेष माहिती धार्मिक श्रद्धा आणि लोकश्रद्धेवर आधारित आहे सर्वसामान्यांचे आवड लक्षात घेऊन इथे ही सादर केली आहे.

## पाचशे चौरस फुटापर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफ करा : निलेश सोनावणे रिपाई पनवेल शहर अध्यक्ष

**दैनिक युवक आधार**

**पनवेल /प्रतिनिधी** : पनवेल चे नागरीकरण वाढत आहे ,वाढती महागाई हि सर्वसामान्य नागरिकांना भेडसावत आहे ,सर्वसामान्य नागरिकांना अप्लाय स्वप्नातील घर घेणे अवघड झाले आहे तर ज्यांनी घरे घेतली आहेत त्यांना गृह कर्जाचा इएमआय ,महावितरण चे वाढीव वीजबिल,इमारतीचा मेन्टेनन्स चार्ज अशा अनेक खर्चांना सामोरे जावे लागत असल्याने किमान पनवेल महानगर पालिकेने पाचशे चौरस फुटापर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफ करावा अशी मागणी



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी पनवेल महानगर पालिकेकडे केली आहे

पनवेल महानगर पालिका क्षेत्रात अल्प उत्पन्न गट ,मध्यमवर्गीय मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत त्यामुळे पनवेल महानगर पालिकेचा मालमत्ता कर भरणे जिकरीचे जात आहेत आधीच उत्पन्न कमी ,वाढती महागाई त्यात दैनंदिन गरजा , मुलांचे शिक्षण आरोग्य या वर देखील वारेमाप खर्च होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांवर कराचा बोजा अधिक होत आहे म्हणून पनवेल महानगर पालिका क्षेत्रातील पाचशे चौरस फुटापर्यंतच्या घरांना मालमत्ता करात सूट द्यावी ,मालमत्ता कर माफ करण्यात यावा अशी मागणी पनवेल शहर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे पनवेल सहर्ष अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी पनवेल महानग पालिकेकडे निवेदनाद्वारे केली आहे .

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवीवर्ष निमित्त प्रोग्राम कार्ड डेकोरेशन स्पर्धा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकूर अर्थात सी. के. टी. विद्यालय इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातर्फे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवीवर्ष निमित्त प्रोग्राम कार्ड डेकोरेशन स्पर्धेचे संस्था स्तरावर आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्या वर्षा प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या स्पर्धेत संस्थेतील शिक्षकांनी सहभाग नोंदवला होता. सहभागी



शिक्षकांनी आपल्या सर्जनशीलतेचा उत्कृष्ट आविष्कार घडवून एकापेक्षा एक आकर्षक प्रोग्राम कार्ड सादर केले. परीक्षक म्हणून कला क्षेत्रातील जाणकार प्रविण जाधव आणि भारतभूषण पाटील यांनी काटेकोर परीक्षकाची भूमिका बजावत विजेत्यांची निवड केली. स्पर्धेत सी. के. टी. विद्यालय इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागाच्या स्नेहल किशोर कडव यांनी प्रथम क्रमांक, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरच्या रूपाली म्हात्रे यांनी द्वितीय क्रमांक, तर चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागातील महेश पोपेटा यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांचे वर्षा ठाकूर यांनी अभिनंदन करत सर्व सहभागी शिक्षकांचे विशेष कौतुक केले. या वेळी वर्षा प्रशांत ठाकूर, स्पर्धेचे परीक्षक प्रविण जाधव, भारतभूषण पाटील, मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, स्पर्धाप्रमुख अनघा भोसले यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

ही संपूर्ण स्पर्धा मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नाने यशस्वीरीत्या पार पडली.

## पैठण तालुका माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या सहसंपर्क समन्वयकपदी राहुल पगारे

**दैनिक युवक आधार**

**मराठवाडा विभाग पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे :** माहिती अधिकाराची प्रभावी अंमलबजावणी तसेच सामान्यातील सामान्य नागरिकांमध्ये या कायद्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी राज्यात कार्यरत असलेल्या माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्यावतीने राज्यभरात संघटनात्मक बांधणी करून कार्यकर्त्यांच्या एकजुटीवर भर दिला जात आहे.याच महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत,महासंघाने पैठण तालुक्यातील नवीन कावसान



येथील राहुल कुंडलिक पगारे यांची महासंघाच्या पैठण तालुका सहसंपर्क समन्वयक या मानद पदावर नियुक्ती करत असल्याचे नियुक्तीचे पत्र महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी दिले केले.जनहितासाठी कायद्याचा वापर करण्याचे आवाहन.

महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर (अध्यक्ष- महाराष्ट्र) यांनी राहुल पगारे यांना नियुक्ती पत्र प्रदान करताना त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतांना राहुल पगारे यांच्याकडून काही महत्त्वाच्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत त्यामध्ये प्रामुख्याने भारतीय संविधान, भारतीय कायदे आणि महासंघाच्या आचारसंहितेचे काटेकोर पालन करणे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ चा वापर व्यापक जनहितासाठी करावा. सर्वसामान्य नागरिकांमध्ये आणि समाजात माहिती अधिकार अधिनियम २००५ चा प्रसार व प्रचार करावा.तसेच सदर नियुक्ती ही पुढील आदेश येईपर्यंत लागू राहील.आणि आपण आपल्या पदांचा वापर अत्यंत जबाबदारीने करावा,असे पत्रात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.राहुल पगारे यांच्या नियुक्तीमुळे मराठवाडा विभागातील पैठण तालुक्यात माहिती अधिकाराच्या कार्याला अधिक बळ मिळणार असल्याची आशा महासंघाने व्यक्त केली आहे.

## आत्मनिर्भरतेसाठी आयडीयाथॉन; सहभागासाठी विद्यार्थ्यांना आवाहन

### आयडीयाथॉन २०२५ साठी नोंदणी सुरु; विजेत्याला पाच रुपयांचे बक्षीस

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : आशियातील पहिली सूचीबद्ध डिपॉझिटरी आणि १६. ७ कोटींहून अधिक डी-मॅट खात्यांची विश्वासार्ह संरक्षक असलेली सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडने ("सीडीएसएल") विद्यार्थ्यांसाठी एक नवीन आव्हानात्मक उपक्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी पहिले आयडीयाथॉन लॉंच केले आहे. सीडीएसएलच्या वार्षिक रीइमॅजिन चर्चासत्राच्या तिसऱ्या आवृत्तीअंतर्गत पुनर्कल्पना आयडीयाथॉन हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

भारतातील शिकण्याच्या, गुंतवणूक करण्याच्या आणि वाढीच्या पद्धतीत बदल घडवून आणतील अशा उपाययोजना डिझाइन करण्यात तरुण नवोन्मेषी मनांना गुंतवून ठेवणे हे आयडीयाथॉनचे उद्दिष्ट आहे. जेणेकरून बाजारातील सहभाग अधिक जबाबदार आणि समावेशक होईल. अधिकाधिक लोकांना आर्थिक क्षेत्रात आणण्यासाठी, त्यांचे दृष्टिकोन समजून घेण्यासाठी तसेच त्यांनी योगदान द्यावे यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी सीडीएसएल तरुण नवोन्मेषकांना प्रोत्साहन देत आहे. सेबी आणि आरबीआय सारख्या

CDSL Convenient • Dependable • Secure | REIMAGINE ideathon

नियामकांच्या समान उपक्रमांवर त्यांचे उपक्रम आधारित आहेत. पुनर्कल्पना आयडीयाथॉन हा एक जबाबदार नवनिर्मितीचा उत्सव आहे. सतत विकसित होत असलेल्या मार्केट लँडस्केपमध्ये, तंत्रज्ञान हे एक उत्प्रेरक आणि विश्वासाचे फ्लायव्हील म्हणून काम करते जे गुंतवणूकदारांना योग्य साधने आणि अंतर्दृष्टी देऊन सक्षम करते. सिक्युरिटीज मार्केट अंतर्ज्ञानी, सर्वसमावेशक आणि प्रत्येक गुंतवणूकदारासाठी प्रवेशयोग्य असणे आवश्यक आहे. हे आयडीयाथॉन राष्ट्र उभारणीचे तसेच आत्मनिर्भर गुंतवणूकदाराचा दृष्टिकोन भक्कम करण्याची सीडीएसएलची वचनबद्धता प्रतिबिंबित करते. सगळ्या गोष्टींची माहिती असलेला गुंतवणूकदार हा सुरक्षित गुंतवणूकदार आहे, जो त्यांच्या आकांक्षा पूर्ण करणारे निर्णय घेण्यास सक्षम आहेआपले भविष्य घडवण्याच्या या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आम्ही विद्यार्थ्यांना आमंत्रित करतो," असे नेहल व्होरा, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, सीडीएसएल म्हणाले.

आयडीयाथॉनमध्ये नावीन्य आणि सर्जनशीलतेसाठी एकूण ११. ५ लाखांचे बक्षीस दिले जाईल. विजेत्या कल्पनेसाठी ५ लाख, उपविजेत्यांना ३ लाख आणि २ लाख तर चौथ्या आणि पाचव्या स्थानासाठी प्रत्येकी ७५ हजार रुपये अशी बक्षिसे दिली जातील. आयडीयाथॉन २०२५ साठी १७ नोव्हेंबर २०२५ रोजी नोंदणी खुली होईल. एका संघात चार विद्यार्थी आणि त्यांचे मार्गदर्शक (एकाच संस्थेतील) सहभागी होऊ शकतात. प्रॉब्लेम स्टेटमेंट, मूल्यमापन आणि टाइमलाइनसंबंधातील अधिक तपशीलhttps://ideathon.cdslindia.com/येथे उपलब्ध आहेत.

# डॉ. मुनीर तांबोळी यांची केंद्रीय लोकशाही पत्रकार संघाच्या महाराष्ट्र अध्यक्षपदी पुन्हा वर्णी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** पत्रकारांचे हक्क आणि न्याय मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या केंद्रीय लोकशाही पत्रकार संघाच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी डॉ. मुनीर तांबोळी यांची पुन्हा एकदा फेर निवड करण्यात आली आहे. तांबोळी यांच्या या नियुक्तीमुळे महाराष्ट्रातील पत्रकार बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



डॉ. तांबोळी यांनी मागील कार्यकाळात पत्रकार संघटनेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात एक मजबूत आणि मोठे जाळे निर्माण केले आहे. पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि समस्या सोडवण्यासाठी त्यांनी केलेले कार्य अत्यंत प्रशंसनीय आणि उल्लेखनीय ठरले आहे. त्यांच्या याच प्रभावी नेतृत्वाची आणि निष्ठेची दखल घेत, त्यांना या अत्यंत महत्त्वाच्या पदावर पुन्हा नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

डॉ. मुनीर तांबोळी यांच्याकडे पत्रकारितेचा दांडगा अनुभव आहे. ते हिंदुस्तान २४ तास न्यूजचे संपादक म्हणून कार्यरत आहेत, तसेच रायगडचा शिल्पकार या वृत्तपत्रातही ते कार्यकारी संपादक म्हणून आपली जबाबदारी सांभाळत आहेत.केंद्रीय लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजू दळवी यांनी डॉ. तांबोळी यांना अधिकृत नियुक्ती पत्र प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

आपल्या फेरनिवडीनंतर डॉ. तांबोळी यांनी माध्यमांशी संवाद साधताना, पत्रकारांच्या हितासाठी सतत कार्यरत राहण्याची ग्वाही दिली. ते म्हणाले, "मी पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी नेहमीच कटिबद्ध आहे आणि यापुढेही प्रामाणिकपणे कार्य करत राहीन."

यासोबतच, संघटनेचे कार्य अधिक गतिमान करण्यासाठी त्यांनी लवकरच एक महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. ते म्हणाले की, लवकरच महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल. यामुळे संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होऊन राज्यातील तळागाळातील पत्रकारांपर्यंत पोहोचणे शक्य होईल. डॉ. तांबोळी यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे कार्य महाराष्ट्रात अधिक जोमाने वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# टेक्निप एनर्जीज इंडियाला ऊर्जा व्यवस्थापन प्रणालीसाठी ISO 50001:2018 प्रमाणपत्र मिळाले

## विविध ऑपरेशन्समध्ये प्रणालीबद्ध आणि शाश्वत ऊर्जा व्यवस्थापनातील उत्कृष्टतेसाठी आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, वार्ताहर :** टेक्निप एनर्जीज इंडियाला त्यांच्या ऊर्जा व्यवस्थापन प्रणाली (EnMS) साठी ISO 50001:2018 प्रमाणपत्र मिळाले आहे, जे कंपनीच्या जागतिक शाश्वतता आणि ऑपरेशनल उत्कृष्टतेच्या ध्येयाला पुढे नेण्यासाठी एक प्रमुख टप्पा आहे.हे प्रमाणपत्र टेक्निप एनर्जीज इंडियाला उद्योगातील एक महत्त्वाचा संदर्भ-बिंदू म्हणून स्थापित करते. ऊर्जा कार्यप्रदर्शन, नवोन्मेष आणि शाश्वतता या क्षेत्रांत नवीन मानदंड निर्माण करताना, पारदर्शक ऊर्जा कार्यप्रदर्शनामुळे भागधारक आणि ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ होतो. तसेच कंपनीची पुरवठा साखळींमध्ये पसंतीची भागीदार म्हणून भूमिका बळकट करत, भारताच्या ऊर्जा संक्रमण प्रवासात एक जबाबदार योगदानकर्त्याची ओळख



अधिक मजबूत होते.हे प्रमाणपत्र नोएडा, मुंबई, चेन्नई, गांधीनगर आणि दहेज येथील मॉड्यूलर मॅन्युफॅक्चरिंग यार्डमधील प्रकल्प व्यवस्थापन, डिझाइन, अभियांत्रिकी, खरेदी, बांधकाम व्यवस्थापन आणि उत्पादन यांचा समावेश असलेल्या टेक्नीप एनर्जी इंडियाच्या ऑपरेशन्सचा पाया तयार करणाऱ्या सुविचारित ऊर्जा व्यवस्थापन प्रणालीची दखल घेते.

टेक्निप एनर्जीज इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक देवेंद्र कुमार यांनी सांगितले कि, "हे प्रमाणपत्र केवळ पालनाशी संबंधित नाही; हे आमची ऑपरेशनल क्षमता वाढवणारे

आणि भारताच्या राष्ट्रीय ऊर्जा प्राधान्यांना बळ देणारे एक धोरणात्मक साधन आहे. तसेच शाश्वत अभियांत्रिकी पद्धतींमध्ये आमच्या नेतृत्वाला अधिक मजबूत करते. ऊर्जा मूल्यसाखळीतील कार्यक्षमता आणि टिकाव यांना चालना देण्यात टेकनिप एनर्जीज इंडियाला अग्रस्थानी स्थान मिळते."

हे प्रमाणपत्र विस्तृत अंमलबजावणी प्रक्रियेनंतर मिळाले आहे, ज्यामध्ये सविस्तर ऊर्जा अभ्यास, मल्टी-साइट मूल्यमापन, प्रशिक्षण आणि प्रणाली-स्तरीय प्रक्रिया सुधारणा यांचा समावेश होता.टेक्निप एनर्जीज इंडियाने पर्यावरणीय परिणाम कमी करण्याच्या दिशेने आधीच उल्लेखनीय प्रगती साधली आहे. २०१३ मध्ये कंपनीच्या दोन प्रमुख कार्यालयांनी पूर्णपणे अक्षय ऊर्जेकडे वळण घेतले. परिणामी, २०२४ मध्ये टेक्निप एनर्जीज इंडियाच्या एकूण वीज वापरातील ५३ टक्के हिस्सा अक्षय ऊर्जेतून प्राप्त झाला.यावर्षी कंपनीने, गुजरात मधील दहेज येथील मॉड्युलर मॅन्युफॅक्चरिंग यार्डमध्ये ७५० किलोवॅट क्षमतेची रूफटॉप सोलार पीव्ही प्रणाली कार्यान्वित केली. या स्थापनेमुळे दरवर्षी १,००० मेगावॅट प्रति तास स्वच्छ ऊर्जा निर्माण होण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे या साइटसाठी स्कोप २ उत्सर्जनात जवळजवळ ५०% घट होईल, जे जगभरातील उद्योगांसाठी प्रगत, स्केलेबल आणि शाश्वत उपाय प्रदान करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारी एक अत्याधुनिक उत्पादन सुविधा आहे.टेक्निप एनर्जीज जबाबदार ऊर्जेचा वापर आणि ऊर्जा कार्यक्षमता सुधारण्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या ऑपरेशनल नियंत्रणांबद्दल जागरूक आहे. सर्व उपक्रम केवळ अंतर्गत कामकाज अनुकूल करण्यासाठीच नव्हे तर कर्मचाऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि ग्राहकांना त्यांचा कार्बन फूटप्रिंट कमी करण्यास सक्षम करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत, जे कमी कार्बन भविष्यासाठी कंपनीच्या सामायिक वचनबद्धतेला अधोरेखित करते.

# टीसीएस इनक्विझिटिव्ह २०२५ च्या मुंबई फेरीचे विजेतेपद ठाणे येथील हिरानंदानी फाउंडेशन स्कूलमधील रोशन कन्ना आणि विवान कुंडेटकर यांनी पटकावले

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) (बीएसई: 532540, एनएसई: टीसीएस) ने मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक क्विझ, टीसीएस इनक्विझिटिव्ह २०२५ च्या मुंबई फेरीचे विजेतेपद ठाणे येथील हिरानंदानी फाउंडेशन स्कूलमधील रोशन कन्ना आणि विवान कुंडेटकर यांनी पटकावले आहे. सर्व फेऱ्यांमध्ये झालेल्या चुरशीच्या स्पर्धेमध्ये ठाणे येथील हिरानंदानी फाउंडेशन स्कूलचे रोशन कन्ना आणि विवान कुंडेटकर यांनी त्यांच्या अतुलनीय बौद्धिक कौशल्याचे प्रदर्शन केले. संयम, अचूकता आणि मनाची एकाग्रता यांच्या बळावर त्यांनी स्पर्धेच्या शेवटच्या क्षणी स्वतःचे वेगळेपण सिद्ध केले आणि राष्ट्रीय अंतिम फेरीत स्थान मिळवले, जिथे ते भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या संघांशी स्पर्धा करतील.

देशातील १२ शहरांमधील हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या टीसीएस इनक्विझिटिव्हचा उद्देश देशातील हुशार विद्यार्थ्यांची बौद्धिक उत्सुकता आणि तांत्रिक कौशल्ये वाढवणे हा आहे देशव्यापी रोमांचक अशा या क्विझ स्पर्धेत, विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय अंतिम फेरीत स्थान मिळविण्यासाठी स्पर्धा करताना जलद उत्तरे देण्याच्या क्षमता आणि



प्रभावी ज्ञानाचे प्रदर्शन केले. देशभरातील १२ शहरांमध्ये इयत्ता ८ ते १२ च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित टीसीएस इनक्विझिटिव्हच्या मुंबई आवृत्तीत २० शाळांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ८० हून अधिक संघांनी भाग घेतला. ठाणे, नाशिक, नवी मुंबई, अहमदनगर आणि रायगड जिल्ह्यांतील अनेक विद्यार्थ्यांनीही उत्साहाने भाग घेतला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून क्लिअरिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडचे (सीसीआयएल) व्यवस्थापकीय संचालक श्री. हरे कृष्ण जेना आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसमार्फत श्री. उज्ज्वल माथूर आणि श्री. मनोज इंदुलकर उपस्थित होते.

याबाबत बोलताना टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे सिनियर व्हाईस प्रेसिडेंट आणि भारताचे कंट्री हेड श्री. उज्ज्वल माथूर म्हणाले, "मी जेव्हा जेव्हा इथे आलो आहे तेव्हा मला काहीतरी नवीन शिकायला मिळाले आहे. हे सर्व धैर्याबद्दल आहे - स्पर्धेत भाग घेतल्याने येणारे धैर्य. हात वर करून बजर दाबण्यासाठी धैर्य लागते. टीसीएसचा हा उत्साह प्रतिबिंबित करतो - प्रश्न विचारण्याची, उत्तरे देण्याची आणि समस्या सोडवण्याची भावना. हा उपक्रम मी गेली सात वर्षे पाहतो आहे, प्रत्येक वर्षी या स्पर्धेने मला काहीतरी वेगळे शिकवले आहे. आणि प्रत्येक वर्षी, अधिकाधिक चांगले संघ पाहायला मिळत आहेत."

टीसीएस इनक्विझिटिव्ह हा एक नाविन्यपूर्ण शिक्षण उपक्रम आहे जो गेल्या दोन दशकांहून अधिक काळ तरुणांना प्रेरणा देत आहे. आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता आणि जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हे उपक्रम सुरू करण्यात आले. यात माहिती तंत्रज्ञान, विज्ञान, क्रीडा, अभियांत्रिकी आणि कला यासह विविध क्षेत्रांचा समावेश आहे. २०२५ ची टीसीएस इनक्विझिटिव्ह अहमदाबाद, बेंगळुरू, भुवनेश्वर, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, इंदूर, कोची, कोलकाता, मुंबई, नागपूर आणि पुणे या १२ शहरांमध्ये आयोजित केली जात आहे. प्रत्येक शहर या प्रवासात एक अनोखा अध्याय जोडेल. सर्वात शेवटी या स्पर्धेची उपांत्य फेरी आणि अंतिम फेरी होईल, विजेत्या शाळेला २०२५ टीसीएस इन्क्विझिटिव्ह राष्ट्रीय विजेतेपदाचा खिताब देण्यात येईल.

# शिवाजी साहेबराव थोरवे यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते "समाजभूषण" पुरस्काराने गौरव

## सामाजिक बांधिलकी, जनसंपर्क आणि शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीची दखल

**दैनिक युवक आधार**

**मुंबई /आण्णासाहेब आहेर:** शिवसेना भगवा सप्ताह २०२५ अंतर्गत सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांच्या सन्मानाचा भव्य सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला,या सोहळ्यात शिवसेना खांदा कॉलनी (पनवेल) शहरप्रमुख व माजी नगरसेवक मा.शिवाजी साहेबराव थोरवे यांना राज्याचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते "समाजभूषण" हा मानाचा पुरस्कार मंगळवार,दिनांक १८,नोव्हेंबर रोजी मंत्रालय येथे प्रदान करण्यात आला.

**शासकीय योजना घराघरांत पोहोचविण्याचे यशस्वी अभियान**

खांदा कॉलनी व पनवेल परिसरात विविध शासकीय योजना प्रत्यक्ष जनतेपर्यंत पोहोचवून त्यांचे निशुल्क लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळवून देण्यासाठी थोरवे यांनी केलेल्या प्रयत्नांची विशेष नोंद घेण्यात आली.जेष्ठ नागरिक योजना,महिला व बालकल्याण योजना,दिव्यांग व वंचित घटकांना लाभ देणाऱ्या विविध योजना,आरोग्य व सामाजिक सुरक्षा योजना सह विविध शासकीय योजना शासनापर्यंत मर्यादित न राहता प्रत्यक्ष नागरिकांच्या दारापर्यंत थोरवे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी पोहोचवल्या त्यामुळे अनेक नागरिकांना त्याचा थेट लाभ मिळाला.



**सामाजिक बांधिलकी आणि जनसंपर्कासाठी विशेष गौरव**

थोरवे यांनी मागील अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रमांद्वारे समाजातील सर्व घटकांना मदत केली आहे. त्यांचे सातत्यपूर्ण जनसंपर्क, नागरिकांशी असलेला विश्वास आणि समस्यांचे त्वरित समाधान करण्याची कार्यशैली यामुळे त्यांची ओळख लोकाभिमुख नेतृत्व म्हणून निर्माण झाली असून सर्व योगदानाची दखल घेत शिवसेना राष्ट्रीय समन्वयक मा.राजसिंह चंदेल यांच्या आयोजनातून हा पुरस्कार देण्यात आल्याचे समारंभात जाहीर करण्यात आले.

**स्थानिक नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण :** थोरवे यांच्या सन्मानामुळे खांदा कॉलनी परिसरात आणि पनवेल शहरात आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. अनेकांनी सामाजिक माध्यमांवरून व प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. समाजाच्या सर्व स्तरांतून त्यांना मिळालेल्या या पुरस्काराचे स्वागत करण्यात येत आहे.स्थानिक नागरिक, शिवसेना पदाधिकारी व सामाजिक संघटनांनी थोरवे यांना पुढील सामाजिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

**शिवसेना भगवा सप्ताहात विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देताना शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख मा.रामदास शेवाळे यांचे मोलाचे योगदान लाभल्यामुळे जनतेला सेवा देता आली असून सदर सेवा भावी कार्याची शिवसेना राष्ट्रीय समन्वयक राजसिंह चंदेल यांनी दखल घेतल्यामुळे मा.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या हस्ते "समाजभूषण" पुरस्कार मिळाल्यामुळे भविष्यकाळात सेवाभावी कार्यासाठी हा समाजभूषण पुरस्कार समाजसेवेसाठी ऊर्जा व आनंद देणारा आहे**

**- श्री शिवाजीराव थोरवे,मा. नगरसेवक,खांदा कॉलनी पनवेल शहर प्रमुख खांदा कॉलनी,पनवेल शहर प्रमुख**






# हिवाळ्यात वाढतोय 'स्ट्रोक' चा धोका ; विशेष काळजी घेण्याचा तज्ज्ञांनी दिला सल्ला

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई वार्ताहर**

**मुंबई :** जसे हिवाळ्यात श्वसन संसर्ग आणि हृदयरोग वाढतात, तसेच ब्रेन स्ट्रोकच्या प्रकरणांमध्येही मोठ्या संख्येने वाढ होते. तापमान कमी झाल्यामुळे शरीरात रक्त गोठण्याची शक्यता अधिक असते आणि शरीराच्या हालचालीवर त्याचा परिणाम होतो. अशा परिस्थितीत रक्तप्रवाह करणाऱ्या धमन्या आकुंचन पावतात आणि मेंदूपर्यंत पोहोचणाऱ्या रक्तप्रवाहाचा वेग मंदावतो. त्यामुळे हृदय आणि मेंदूला पुरेसे रक्त मिळत नाही. ऑक्सिजन आणि रक्ताच्या प्रवाहात अडथळा आल्याने रक्ताची गुठळी तयार होते व पक्षाघाताचा(ब्रेन स्ट्रोक) धोका वाढतो.

तापमानात घट झाल्याने उच्च रक्तदाब, रक्ताच्या गुठळ्या, निर्जलीकरण होणे अशा समस्या आढळून येतात. डॉक्टर लोकांना, विशेषतः उच्च रक्तदाब, मधुमेह किंवा हृदयरोग असलेल्यांना, थंडीच्या काळात विशेष सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे.

ब्रेन स्ट्रोकचे दोन प्रकार असतात, पहिला म्हणजे इस्केमिक ब्रेन स्ट्रोक आहे. यामध्ये मेंदूच्या धमन्यांमध्ये रक्ताच्या गुठळ्या तयार झाल्याने रक्तप्रवाहात अडथळा निर्माण होतो. यामुळे त्यामुळे मेंदूच्या पेशींना पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही आणि त्यामुळे या पेशी वेगाने नष्ट होऊ लागतात. दुसऱ्या स्थितीत रक्तस्रावाचा झटका येतो. यामध्ये मेंदूची रक्तवाहिनी फुटल्याने रक्तस्राव होऊन अतर्गत भागात रक्त साचते. हिवाळ्यात स्ट्रोकच्या रुग्णांची संख्या वाढते कारण थंड हवामानामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, रक्तदाब वाढतो आणि रक्त गोठते. व्यायामाचा अभाव, डिहायड्रेशन आणि प्रदूषणामुळे याचा धोका अधिक वाढतो. हिवाळ्यातील डिहायड्रेशनकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. परंतु सौम्य डिहायड्रेशन देखील रक्ताच्या गुठळ्या निर्माण करू शकते, ज्यामुळे गोठण्याची शक्यता वाढते. फ्लू आणि न्यूमोनियासारख्या संसर्गामुळे रक्तवाहिन्यांना सूज येते. ज्यांना आधीच हृदयरोग, मधुमेह किंवा उच्च कोलेस्ट्रॉल आहे त्यांना स्ट्रोकचा धोका अधिक असतो. हिवाळ्यात ३० ते ६५ वयोगटातील लोकांमध्ये स्ट्रोकच्या प्रकरणांमध्ये १०% वाढ होते. जर कोणाला अचानक अशक्तपणा, चेहरा अचानक वाकडा होणे किंवा बोलताना त्रास होणे यासारखी सुरुवातीची लक्षणे दिसली तर त्यांनी ताबडतोब रुग्णालयात जावे,अशी प्रतिक्रिया नवी मुंबईतील न्यूईरा हॉस्पीटलचे न्यूरोसर्जन (मेंदू आणि मणका) डॉ. सुनील कुट्टी यांनी व्यक्त केली.

डॉ. सुनील कुट्टी पुढे सांगतात की, सीटी आणि एमआरआय स्कॅनसारख्या न्यूरोइमेजिंगमुळे डॉक्टरांना स्ट्रोकचा प्रकार आणि स्थान ओळखण्यास मदत होते, ज्यामुळे जलद आणि अचूक उपचार शक्य होतात. इस्केमिक स्ट्रोकमध्ये रक्त प्रवाह सुरू झाल्यानंतर काही तासांत दिला तर रक्तस्राव पुनर्संचयित करण्यासाठी विशेष औषधांचा वापर केला जातो. यामध्ये क्लॉट-बस्टिंग ड्रग्ज (टीपीए सारखी) वापरले जातात. उपचार करताना, स्ट्रोकच्या स्थितीनुसार, डॉक्टर सीटी स्कॅन, एमआरआय यांसारख्या चाचण्या करून घेतात. एखाद्या प्रकरणामध्ये रक्ताची गुठळी तयार झाली असेल तर, त्यावर औषधांनी उपचार करता येऊ शकतो. पण धमनी फुटल्यामुळे मेंदूच्या कोणत्याही भागात रक्ताच्या गुठळ्या झाल्या असतील तर शस्त्रक्रिया हाच पर्याय ठरतो. एंडोव्हस्कुलर थेरपी ही मिनीमली इन्व्हेसिव्ह प्रक्रिया, डॉक्टरांना कॅथेटर वापरून क्लॉट काढून टाकण्यास मदत करते. ब्रेन स्ट्रोकची लक्षणे जाणवल्यास रुग्णाला ताबडतोब रुग्णालयात नेणे अवश्यक असते. हा त्रास झाल्यावर पहिले तीन ते चार तास (गोल्डन अवर्स) हे उत्तम उपचारांसाठी अतिशय महत्वपूर्ण ठरतात. स्ट्रोक प्रतिबंधाकरिता त्याबाबत जागरूकता आणि नियमित आरोग्य तपासणीने गरजेची आहे. वेळोवेळी रक्तदाब तपासणे, सक्रिय जीवनशैली बाळगणे आणि हायड्रेशन राखणे यामुळे स्ट्रोकचा धोका कमी होतो. धूम्रपान टाळणे, मद्यपानाचे सेवन मर्यादित करणे आणि शरीराचे तापमान सामान्य राखण्यासाठी उबदार कपडे घालणे गरजेचे आहे.हिवाळ्यात तापमानात घट झाल्याने रक्तवाहिन्या अरुंद होतात, ज्यामुळे रक्तदाब वाढतो आणि हृदयावर ताण येतो. बरेचजण हिवाळ्याय व्यायामाचा कंटाळा करतात, पाणी कमी पितात या सर्वांमुळे रक्ताच्या गुठळ्या तयार होण्याचा धोका वाढतो. सांकेतिक भाषेत स्ट्रोकच्या लक्षणांचे वर्गीकरण हे बीफास्ट (BEFAST) असेही करता येते. याचा अर्थ (बॅलेन्स - संतुलन कमी होणे, आईज- दृष्टी धूसर होणे किंवा कमी होणे, फेस- चेहऱ्याचा काही भाग क्षीण होणे, आर्म- हात कमकुवत होणे, स्पीच- बोलण्यात अडचणी आणि टाईम- वेळ). वरिल लक्षणं आढळल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्या. वेळीच उपचारान् अमुल्य जीव वाचू शकतो आणि अर्धांगवायू किंवा मृत्यूसारखे दीर्घकालीन अपंगत्व टाळता येते. गोल्डन अवरमध्ये (पहिल्या 60 मिनिटांत) रुग्णालयात पोहोचल्याने मृत्यूचा धोका टाळता येतो आणि दीर्घकालीन अपंगत्व टाळता येते. रक्ताच्या गुठळ्या दूर करण्यासाठी औषधं, थ्रोम्बेक्टॉमी आणि रिहॅबिलेशन यासारख्या उपचारांमुळे शारीरीक हालचाल आणि बोलताना येणारा अडथळा दूर करता येऊ शकतो. रक्तदाब नियंत्रणात ठेवून, शरीर सक्रिय राखुन तसेच निरोगी आहाराच्या सेवनाने स्ट्रोकचा धोका टाळता येतो.धूम्रपान टाळणे आणि नियमित आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. लक्षात ठेवा, जवळजवळ ८०% स्ट्रोक हा त्याबाबत असलेली जागरूकता आणि वेळीच वैद्यकीय उपचारान् रोखता येतो अशी प्रतिक्रिया इंडियन स्ट्रोक असोसिएशन (ISA) चे सचिव, स्ट्रोक स्पेशलिस्ट आणि न्यूरोलॉजिस्ट डॉ. अरविंद शर्मा यांनी व्यक्त केली.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# श्रीवर्धन तालुक्यातील खेड्यांची हाक : “नेता नको... जनतेचा माणूस द्या"

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी । अनिकेत मोहित** : श्रीवर्धन तालुक्यातील अनेक खेड्यांचं आयुष्य आजही अडचणींनी वेढलेलं आहे. पावसात चिखलाने भरलेले रस्ते, उन्हाळ्यात पाण्यासाठी होणारी धावपळ, तरुणांसमोर रोजगाराचा अभाव... अशा अनेक संकटांमध्ये इथली माणसं रोजच्या जगण्यासाठी झगडत आहेत. वर्षानुवर्षे आश्वासने मिळाली, योजना दाखवल्या गेल्या, पण गावाचा चेहरा बदलण्याची वेळ मात्र कधीच आली नाही. निवडणुका आल्या की गावाकडे राजकीय पक्षांची वर्दळ वाढते. मोठी भाषणं, आश्वासनांचा पाऊस, विकासाची स्वप्नं... पण मतांची पेटी बंद होताच त्या सगळ्याचं अस्तित्वही संपतं. गाव पुन्हा तसंच धूळ, चिखल आणि प्रतीक्षा, आज गावकऱ्यांना खूप मोठ्या अपेक्षा नाहीत ते अवाढव्य



प्रकल्प मागत नाहीत. त्यांना फक्त एवढंच हवंय की एखादा नेता त्यांच्या अडचणी समजून घ्यावा. घरात बसून चहाचा घोट घेताना त्यांचे प्रश्न मनापासून ऐकावा. शब्दांनी नाही, तर कृतीने त्यांना साथ द्यावी.म्हणूनच आज श्रीवर्धन तालुक्यातील खेड्यांकडून एक सरळ, स्पष्ट आणि मनाला भिडणारी मागणी समोर आली आहे. “आम्हाला असा स्थानिक नेता द्या, जो खरोखर आमच्यासाठी काम करेल. निवडणूक संपली तरी गावात राहील. विकासाचं आश्वासन नाही, तर विकासाची दिशा देईल.” गावकऱ्यांना आता चमकदार पदं, मोठमोठे बोर्ड, आणि तडक भाषणांची गरज नाही. त्यांना हवा आहे साधा, सरळ, काम करणारा जनसेवक जो सेवा करतो म्हणूनच नेता ठरतो आज गावं नेता शोधत नाहीतगावं आपलं माणूस शोधत आहेत.

# स्तन कॅन्सरच्या प्रगत देखभालीसाठी जागतिक मार्गदर्शक सूचनांमध्ये भारतीय योगदान महत्त्वपूर्ण

## ८व्या ॲडव्हान्स्ड ब्रेस्ट कॅन्सर कॉन्फरन्समध्ये भारतीय प्रतिनिधीत्व डॉ ज्योती बाजपेयी यांनी केले

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी** : अपोलो हॉस्पिटल्सने जाहीर केले आहे की, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई आणि महाराष्ट्रातील मेडिकल आणि प्रिसिजन ऑन्कोलॉजीच्या लीड कन्सल्टंट, डॉ.(प्रोफेसर) ज्योती बाजपेयी यांनी नुकत्याच पोर्तुगालच्या लिस्बन येथे आयोजित करण्यात आलेल्या एबीसी८-ॲडव्हान्स्ड ब्रेस्ट कॅन्सर इंटरनॅशनल कन्सेन्सस कॉन्फरन्समध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. एबीसी८ हा जगातील एक सर्वात प्रतिष्ठित मंच आहे. येथे स्तनाच्या कर्करोगावरील उपचार आणि देखभाल क्षेत्रातील आघाडीचे विशेषज्ञ नवीन पुराव्यांचे पुनरावलोकन करण्यासाठी, नव्याने उदयास येत असलेल्या उपचार पद्धतींवर चर्चा करण्यासाठी आणि पुढच्या टप्प्यात पोहोचलेल्या स्तनाच्या कर्करोगाच्या उपचारांसाठी आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे अद्ययावत करण्यासाठी एकत्र येतात.

डॉ. बाजपेयी यांनी सांगितले की, या वर्षाची बैठक विशेषतः महत्त्वपूर्ण होती, ज्यामध्ये डॉ. फातिमा कार्डोसो, डॉ. लॅरी नॉर्टन, डॉ. एरिक वायनर, डॉ. होप रूगो, प्रो. नादिया हार्बेक, डॉ.रेबेका डेंट, आणि डॉ.सँड्रा स्वेन आणि इतर अनेक आघाडीच्या डॉक्टारांनी प्रतिनिधींना वैद्यकीय क्षेत्रातील अशा नवीन संशोधन, उपचार किंवा तंत्रज्ञानाबद्दल माहिती दिली, जे डॉक्टर आणि आरोग्य सेवा प्रदात्यांच्या सध्याच्या कार्यपद्धतीत बदल करतील किंवा महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणतील. हे उपचार दीर्घकाळात रुग्णांच्या आरोग्यावर परिणाम करतील.ॲडव्हान्स्ड (मेटास्टेटिक/स्टेज IV) स्तनाचा कर्करोग पूर्वी जवळजवळ असाध्य मानला जात असे, परंतु अलिकडच्या वर्षांत या आजाराच्या उपचाराकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे, टार्गेटेड आणि वैयक्तिक उपचारांमुळे रुग्णांना दीर्घ आणि उत्तम गुणवत्तेचे जीवन मिळत आहे.

डॉ. ज्योती बाजपेयी म्हणाल्या,"एबीसी८ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणे खरोखरच सन्मानाची गोष्ट होती. यातील चर्चा रुग्ण आणि त्यांच्या वास्तविक जीवनातील परिस्थितीशी संबंधित अतिशय महत्त्वाच्या विषयांवर केंद्रित होत्या. डॉ. फातिमा कार्डोसो आणि संपूर्ण जागतिक टीमची मी अत्यंत ऋणी आहे, कारण त्यांनी असे वातावरण निर्माण केले जिथे विज्ञान, सहानुभूती आणि वास्तविक सहकार्य एकत्र येतात. आमचे ध्येय स्पष्ट आहे: ठोस डेटाचे आशेमध्ये रूपांतर करणे आणि आम्ही ज्या प्रगतीबद्दल बोलत आहोत, ती लोकांच्या जीवनात वास्तविक बदल घडवून आणू शकेल हे सुनिश्चित करणे."

मुख्य सत्राचे अध्यक्षपद डॉ.बाजपेयी यांनी ज्युलिया मौसे यांच्यासह भूषवले. डॉ. बाजपेयींनी सांगितले की, ज्युलियाची कथा ही एक प्रभावी आठवण करून देते की आता उपचार खूप पुढे गेले आहेत आणि रुग्ण गंभीर आजारासोबतही (ॲडव्हान्स डिसीज) बराच काळ जगू शकतात. (ज्युलिया स्वतः एक स्तन कर्करोग (ब्रेस्ट कॅन्सर) सर्व्हायव्हर आहेत आणि गेल्या दहा वर्षांपासून त्या मेंदूच्या मेटास्टेसिससोबत (मेंदूपर्यंत पसरलेल्या कर्करोगासोबत) जीवन जगत आहेत. त्यांच्या उदाहरणावरून हे स्पष्ट होते की आधुनिक वैद्यकीय उपचारांमुळे रुग्णांचे आयुष्यमान वाढले आहे.)

त्यांचा सहभाग जागतिक सहभाग, संशोधन आणि सातत्याने शिकण्याच्या माध्यमातून कॅन्सर उपचार व देखभालीमध्ये प्रगती घडवून आणण्याप्रती अपोलोची बांधिलकी दर्शवतो. त्यामुळे हे सुनिश्चित होते की, भारतीय रुग्णांना सर्वात नवीन आंतरराष्ट्रीय मापदंडांचे लाभ मिळतील. आजच्या काळात कॅन्सर देखभालीचा अर्थ ३६० डिग्री अर्थात सर्वसमावेशक, व्यापक देखभाल असा होतो, त्यासाठी कॅन्सर तज्ज्ञांची वचनबद्धता, नैपुण्ये आणि दृढ संकल्प यांची आवश्यकता असते.

# मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

## सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित,अप्पर पोलीस अधीक्षक डॉ.राठोड यांच्या हस्ते झाला सन्मान

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी । मारुती सत्रे :** आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील सुदर्शन विद्यालयाचे मुख्याध्यापक आनंदवाडी सराटेवडगावचे सुपुत्र साईनाथ बोडखे सर यांना नुकताच लोकशक्तीच्या वतीने 'लोकशक्ती महाराष्ट्र गौरव 'आदर्श शिक्षक' हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित आले. सिनेअभिनेत्री चित्रा दिक्षित, नागपूर येथील अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. दत्ताराव राठोड, गावरान मस्ती फेम वैभव कुन्हाडे (गंठणकुमार), ज्येष्ठ साहित्यिक ऐश्वर्य पाटेकर, डॉ. कैलास दौंड, दैनिक झुंजारनेता'चे उपसंपादक उत्तम




बोडखे, लोकशक्तीचे संपादक विजय लेंडाळ, सहसंपादक इम्रान शेख, पत्रकार जावेद सय्यद व इतर मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. साईनाथ बोडखे हे हे शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी संचलित सांगवी पाटण येथील सुदर्शन विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्राबरोबरच ते सामाजिक क्षेत्रातही उत्कृष्ठ कार्य करीत आहेत. शैक्षणीक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावत असल्याने त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. साईनाथ बोडखे सर यांनी गेली २५ वर्षात हजारो विद्यार्थी घडविले आहे. आज त्यांचे अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी विविध क्षेत्रात उच्चपदस्थ अधिकारी पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना नुकताच अहील्यानगर येथील हॉटेल यशग्रँड येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात लोकशक्ती महाराष्ट्र गौरव आदर्श शिक्षक राज्यस्तरीय पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

पुरस्कार मिळाल्याबद्दल मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांचे माजी आ. भीमराव धोंडे, प्रशासन अधिकारी शिवदास विधाते, डी.बी राऊत, माऊली बोडखे, संदीप नन्नवरे, सागर वाघुले, पत्रकार उत्तम बोडखे, समीर शेख, सेवानिवृत्त प्राचार्य महादेव दानवे, मुख्याध्यापक बाळासाहेब राऊत यांनी अभिनंदन केले.

# पर्यटन स्थळ रावनवाडी(जला.) येथे कोदावशय यात्रेनिमित्त डॉ.अक्षय कहालकर यांचे हस्ते वडसा संच नाटकाचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**भंडारा-** जिल्ह्यातील पहेला परिसरातील निसर्गरम्य वातावरण लाभलेल्या पर्यटन स्थळ म्हणून उदयास आलेल्या रावनवाडी येथे दि. 20 नोव्हेंबर ला मोफत नाटकाचे आयोजन करण्यात आले असून नाटकाचे उद्घाटन डॉ.अक्षय कहालकर यांचे हस्ते करण्यात आले.

पर्यटन स्थळ रावनवाडी(जलाशय) येथे अनेक वर्षांपासून कोदावश यात्रेनिमित्त मोफत तीन अंकी नाटकाचे आयोजन करण्यात येते. ह्यावर्षी नाटकाचे नाव "तुच माझी सौभाग्यवती". सामाजिक, सांस्कृतिक व कौटुंबिक विषयांवर झाडीपट्टी वडसा कलाकारांतर्फे अतिशय रोचक नाटकाचे संचलन करण्यात येत असते. अंबामाता देवस्थान कमिटी तर्फे व गावकऱ्यांच्या पुढाकारातून दरवर्षीच आयोजन करण्यात येते. परिसरातील नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित असतात तसेच यात्रेनिमित्त परंपरागत जेवणाची रेलचेल असते.

कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.अक्षय कहालकर,



भंडारा जिल्हा परिषद अध्यक्षा कविताताई उईके, अध्यक्ष दयानंदजी नखाते, निलकंठजी कायते, पंचायत समिती सदस्या समिताताई रामटेके,नरेंद्रभाऊ रामटेके, काजल चवळे, सरपंचा ओमकांता पंधरे, शालिकजी लुटे ग्रामसेवक, रूपेशजी जिभकाटे तसेच ग्रामपंचायत सदस्य प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन अंबामाता देवस्थान कमिटीचे अध्यक्ष अविनाश उईके, यादोराव कुथे, कवडूजी फेंडर, जगदीशजी उईके, लोकेश भोंगाडे व गावकरी यांनी केले असून कार्यक्रमाचे संचालन रूपेश फेंडर तर आभार प्रदर्शन यादोरावजी कुथे यांनी मानले.

# हिंदुसभा रुग्णालय वाचलेच पाहिजे यासाठी लढा देत,हिंदूसभा रुग्णालय वाचवा संघर्ष समितीच्या माध्यमातून घाटकोपरकर एकवटले

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर (केतन भोज) :** घाटकोपर च्या गोरगरीब जनतेच्या हक्काचे ट्रस्ट चे हिंदुसभा रुग्णालय झालेच पाहिजे,या मागणीसाठी होणाऱ्या या आंदोलनात हिंदूसभा रुग्णालय वाचवा संघर्ष समितीच्या माध्यमातून घाटकोपर मधील सर्व नागरिक,सर्व राजकीय पक्ष,रुग्णालयात काम करणारे कर्मचारी हे सर्व एकत्र येत हिंदूसभा रुग्णालयासमोर,घाटकोपर रेल्वे स्थानक जवळ,घाटकोपर पश्चिम याठिकाणी गुरुवार दि.२० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६:३० वाजता हिंदूमहासभा रुग्णालय वाचवा संघर्ष समितीचे प्रमुख आणि घाटकोपर प्रगती मंच चे अध्यक्ष पत्रकार प्रशांत बढे यांच्या नेतृत्वाखाली एकत्र स्वाक्षरी मोहीम घेत आंदोलन,निदर्शने करण्यात



आली.यावेळी आंदोलनाची पहिली ठिणगी पेटली.गेली तीन वर्ष तोडून ठेवलेले आणि संशयात्मकरित्या इथले काम थांबवून ठेवण्यात आलेले घाटकोपरचे हिंदूसभा रुग्णालय पुन्हा तत्काळ सुरू करावे. निर्माण कार्याला ही तत्काळ सुरुवात करावी,या रुग्णालयातील सुमारे साडेचारशे मराठी,अनुसूचित जाती जमातीचे तसेच इतर समाजाचे कर्मचारी यांना पुन्हा या रुग्णालयात कामाला घ्यावे,या रुग्णालयाचे नामकरण हे एच जे दोषी हिंदूसभा रुग्णालय असावे, रुग्णालय पूर्णपणे ट्रस्टचे आणि फक्त रुग्णालयच व्हावे,रुग्णालयाचे दर हे पूर्वीप्रमाणेच ट्रस्ट च्या दरात असावे.या प्रमुख पाच मागण्यांसाठी हिंदूसभा रुग्णालय वाचवा संघर्ष समितीच्या माध्यमातून स्वाक्षरी मोहीम




आणि निदर्शने करण्यात आले. हिंदूसभा रुग्णालय वाचवा संघर्ष समितीच्या या आंदोलनात हिंदूसभा रुग्णालयातील कर्मचारी यांची उपस्थिती प्रशंसनीय होती यावेळी रुग्णालयातील सर्व कर्मचारी यांनी त्यांची व्यथा मांडून आंदोलन किती महत्वाचे होते हे निदर्शनास आणून दिले.या आंदोलनात हिंदूसभा रुग्णालय वाचवा संघर्ष समितीचे सौ.कांचन प्रशांत बढे-तारी,सुभाष कोकणे,शरद भावे तसेच घाटकोपर प्रगती मंचचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घाटंजी मध्यवस्तीतील देशी दारू दुकानाविरोधात दुर्गामाता वॉर्डातील महिला-नागरिकांचा संताप!

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी । महेश पेन्दोर** : शहराच्या दुर्गामाता वॉर्डातील मध्यवस्तीत देशी दारूच्या दुकानाला परवानगी मिळाल्याच्या वृत्ताने येथील स्थानिक नागरिक संतप्त झाले आहेत. या रहिवासी परिसरात दारूचे दुकान सुरू होऊ नये, यासाठी महिला, पुरुष, वृद्ध आणि तरुणांनी एकत्र येत आमदार राजू तोडसाम आणि नगरपरिषद मुख्याधिकारी यांना जोरदार निवेदन दिले. विशेष म्हणजे, या संवेदनशील मुद्द्यावर आमदारांचे समर्थन असल्याची चर्चा स्थानिक लोकांमध्ये दबक्या आवाजात सुरू आहे.

**नागरिकांचा तीव्र विरोध**

काही दिवसांपूर्वी देशी दारू दुकानाच्या परवानगीची माहिती मिळताच स्थानिक रहिवाशांनी एकत्र येऊन याला विरोध दर्शविण्यास सुरुवात केली. बुधवार, दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी नागरिकांनी आपला संताप व्यक्त करत आमदार राजू तोडसाम यांना भेटून दारू दुकानाची परवानगी त्वरित रद्द करण्याची एकमुखी मागणी केली.

**निवेदनातील प्रमुख मुद्दे:**



मध्यवस्ती: हा परिसर पूर्णपणे रहिवाशांचा असून येथे दारू दुकान सुरू झाल्यास अनेक समस्या निर्माण होतील.

शिक्षण संस्थांचा गराडा: या ठिकाणी नगरपरिषद शाळा, कॉन्व्हेंट आणि अनेक शिकवणी वर्ग आहेत. त्यामुळे विद्यार्थी, महिला आणि पालकांची सतत वर्दळ असते.

व्यसनाधीनतेची भीती: दारू दुकानामुळे परिसरातील तरुणांमध्ये व्यसनाधीनता वाढण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

आमदारांना निवेदन दिल्यानंतर संतप्त जमावाने नगरपरिषद गाठून मुख्याधिकाऱ्यांनाही निवेदन देत त्वरित कारवाईची मागणी केली.

**'जनसुनावणी' घेऊनच अंतिम परवानगी द्या!**

स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग, यवतमाळ यांनाही निवेदन देण्याचा निर्णय घेतला आहे. नागरिकांची मुख्य मागणी अशी आहे की, जर प्रशासकीय विभागांनी या दुकानाला यापूर्वीच सर्व परवानग्या दिल्या असतील, तर परिसरातील नागरिकांची जाहीर जनसुनावणी घेतल्याशिवाय अंतिम परवानगी देऊ नये.

**आमदारांवर 'सपोर्ट'ची दबक्या आवाजातील चर्चा**

या संपूर्ण प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर, आमदार राजू तोडसाम यांना नागरिकांनी भेटून मागणी केलेली असतानाही, स्थानिक लोकांमध्ये एक चर्चा रंगू लागली आहे. घाटंजीतील अनेक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, या देशी दारू दुकानाच्या बट्टीला आमदारांचा 'सपोर्ट' असल्याची चर्चा परिसरात दिसत आहे. या संवेदनशील मुद्द्यावर लोकप्रतिनिधींचे नेमके काय मत आहे आणि ते नागरिकांच्या बाजूने उभे राहतात की नाही, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राज्यस्तरीय आदिवासी विकास विभागाच्या विविध वस्तू प्रदर्शन व विक्री कार्यक्रमामध्ये गोंदिया जिल्हयातील आश्रमशाळेतील मुलींचा सहभाग

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड प्रतिनिधी । गोंदिया जिल्हा :** दिनांक 15 नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांचा 150 व्या जन्मदिनी नागपूर येथे तिनंदिवाशीय जनजातीय गौरव दिवस हा राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. सदर महोत्सवात राज्यस्तरीय आदिवासी पारंपारिक हस्तकला प्रदर्शन व विक्रि, आदिवासी पारंपारिक नृत्य स्पर्धा तसेच इतर अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याठिकाणी देवरी प्रकल्पातील आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थिनींनी तयार केलेल्या वस्तूचे प्रदर्शन केले. विशेष म्हणजे या सहभागामध्ये मुलींनी गोंडी कलेच्या माध्यमातून विविध वस्तूवर गोंडी चित्र रेखाटले होते यामध्ये फाईल, पेन फोल्डर, डायरी, स्कार्प, ज्वेलरी बॉक्स, Key




Holder, गोंडि पेंटिग, सजावटिच्या वस्तू अश्या वस्तू विक्रिला ठेवलेल्या होत्या.त्याच बरोबर चंद्रपुर येथील बांबु संशोधन केंद्राच्या माध्यमातून उन्हाळी शिबिरामध्ये प्रशिक्षित झालेल्या मुलींनी बांबू पासून विविध वस्तू बनविल्या आणि विक्रिला ठेवलेल्या होत्या. या प्रदर्शनी मध्ये मुलींनी जवळ-जवळ दोन ते तिन दिवसामध्ये वीस हजाराच्या वस्तूची विक्रि करून आपल्या मध्ये असलेले प्रदर्शनात्मक, कलात्मक आणि मार्केटिगची चुणूक दाखवून दिली. प्रदर्शन व विक्रि कार्यक्रमादरम्यान मा.ना. प्रा.डॉ.श्री.अशोक ऊईके मंत्री आदिवासी विकास तसेच श्री. मा.ना.नरहरी झिरवळ मंत्री अन्न व औषध

> **उन्हाळी शिबीर आणि मा.जिल्हाधिकारी यांच्या स्किल डेव्हलोपमेंट संकल्पनेचा परिणाम दिसून आला, या विद्यार्थ्यांना आणखी तज्ञ् प्रशिक्षण आणि त्यातून आत्मविश्वास,शिक्षण अर्थार्जन,यानुसार भविष्यात नियोजन करण्यात येत आहे.**
>
> **- उमेश काशिद**
> **प्रकल्प अधिकारी देवरी**

प्रशासन तसेच मा.श्री. संजय पुराम आमदार आमगाव विधानसभा क्षेत्र तसेच आदिवासी विकास विभागाचे सचिव श्री.विजय वाघमारे, मा.आयुक्त लिना बन्सोड मॅडम, मा.अप्पर आयुक्त आयुषी सिंग यांनी भेटि दिल्या. विद्यार्थ्यांनी केलेल्या कलाकृतीची प्रशंसा केली. सदर तिन दिवसीय कार्यक्रमा मध्ये महाराष्ट्रातिल विविध समुदायाचे नागरीक भेटिसाठी आलेले होते आणि त्यांनी मुलींनी बनविलेल्या कलाकृतीचे व वस्तूचे प्रशंसा केली व वस्तू खरेदि केल्या.

सदर प्रदर्शनाच्या माध्यमातून मुलींमध्ये वेगळा आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झालेली आहे. देवरी प्रकल्प कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या उन्हाळी शिबिर व हिवाळी शिबिर मध्ये मुलींनी या कलाकृती शिकल्या याच्या पुढे ही या मुलींना गोंडि कला आणि बांबू पासून विविध वस्तू बनविणाऱ्या तज्ञ प्रशिक्षकांच्या मार्फत आणखी उच्च प्रशिक्षण देण्याचे प्रकल्पाने आयोजिले असून येणाऱ्या कालावधी मध्येहि या विद्यार्थिनींच्या माध्यमातून आश्रमशाळेच्या ईतर मुलींनाही कलात्मक दृष्ट्या भक्कम बनविण्यासाठि प्रयत्न करण्यात येणार आहेत. विशेषत: विद्यार्थी आश्रमशाळेमध्ये निवासी असल्याकरणाने बहुतांश वेळ अभ्यासाव्यतिरिक्त कलाकृती मध्ये गुंतवला जावा हा या मागचा उद्देश असून यामधील विद्यार्थिनी मधील कलाकृतीचे गुण पुढे आणणे आणि त्यातून स्वयंम रोजगाराचे साधन तयार करण्यात येणार आहे.

मा.मंत्री महोदय झिरवळ साहेब यांनी भेट देवून मुलींची प्रशंसा केली व मार्केटिंग कशी करायची व ग्राहकांशी कसे बोलावे याबद्यल मार्गदर्शन केले तसेच माजी अपर आयुक्त मा.ठाकरे साहेब यांनी सुध्दा भेट देवून मुलींची प्रशंसा व मार्गदर्शन केले.

तसेच इतर प्रकल्पातील विस्तार अधिकारी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी आपल्या प्रकल्पामध्येही हि संकल्पना लागु करण्यास माहिती जाणून घेतली. एकंदरीत देवरी प्रकल्पातील आश्रमशाळेतील विद्यार्थीनींनी कलेच्या माध्यमातून शिक्षणासोबतच प्रदर्शनित विविध वस्तूची विक्रि करून जे वीस हजारांचे अर्थाजन केले ते इतर विद्यार्थ्यासाठि नक्कीच प्रेरणादायी ठरतील. देवरी प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी मा.उमेश काशिद, सहाय्यक प्रकल्प अधिकारी डॉ.सायली चिखलिकर, कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी, तसेच आश्रमशाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थीनींनी यश प्राप्त करण्यास मदत झाली आणि विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे व कलागुणांना पुरक वातावरण देण्यास प्रकल्प कार्यालयाकडून आवश्यक ते प्रयत्न सुरु आहे.

## थोडक्यात

### इसम बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**बिल्डिंग खालून येतो असे सांगून घराबाहेर पडलेला एक इसम अद्याप घरी न परतल्याची घटना करंजाडे वसाहतीमध्ये घडली असून याबातची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. महादेव शिवाजी सोनावणे (वय ४० वर्षे रा. से-०४ करंजाडे) असे या इसमाचे नाव असून त्याचा रंगाने सावळा, उंची ५ फुट ३ इंच, अंगाने मजबुत, चेहरा उभट, डोक्याचे केस काळे मध्यम वाढलेले, डोळे -काळे, नाक - सरळ, निशाणी उजव्या हाताचे मधले बोट तुटलेले, अंगात खाकी रंगाचा डीझायन असलेला फुल बाह्यांचा शर्ट, निळ्या रंगाची फुल जिन्स पॅन्ट, पायात काळ्या रंगाची चप्पल, मराठी, हिंदी भाषा अवगत आहे. या इसम बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोहवा युवराज म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा.

### तळोजा पोलिसांची तीन वेगवेगळ्या ठिकाणी गुटख्यावर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):** तळोजा पोलिसांनी हद्दीतील तीन वेगवेगळ्या ठिकाणी बेकायदेशीर रित्या विक्री करणाऱ्या गुटख्यावर या पदार्थावर कारवाई करून जवळपास आत्ता पर्यंत २ लाख ३५ हजार २८४ रुपये किमतीचा गुटखा हस्तगत केला असून तिघा जणांविरोधात कारवाई केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने तळोजा परिसरातील ३ वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करून जवळपास २ लाख ३५ हजार २८४ रुपये किमतीचा गुटखा हस्तगत केलं असून त्यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २२३ , २७४,२७५,१२३ सह अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम २६,२७,५९ अन्व्ये २ पुरुष व १ महिलेवर कारवाई करण्यात आली.

### ज्येष्ठ नागरिक महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून दोघेजण पसार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :** पायी जात असलेल्या एका ज्येष्ठ नागरिक महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून दोघेजण मोटार सायकली वरून पसार झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. श्रेयसी श्रीकांत कर्वे (वय ६७ रा. पदमवती सोसायटी) या विघ्नेश मेडिकल समोर स्वामी नित्यानंद मार्ग पनवेल येथून पायी जात असताना मोटार सायकली वारूळ आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या गळ्यातील जवळपास २ लाख २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून ते पसार झाले आहेत या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### नोकरीला लावतो असे सांगून १६ लाख रुपये किमतीची फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :** आपण डीआरआय महदये वरिष्ठ अधिकारी असल्याचे सांगून काही जणांना नोकरीला लावतो अशी बतावणी करून त्यांच्या कडून जवळपास १६ लाख ४४ हजार ४९९ तुपयेरुपये फसवणूक करून काढून घेतल्याची घटना पनवेल शहरात घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे . करण पदमा यांनी दिलेल्या तक्रारी नुसार अक्षय निंबाळकर हे डीआरआय मध्ये वरिष्ठ अधिकारी असल्याचे खोटे सांगून त्याने करण पदमा यांच्यासह इतर अनेकांना नोकरीचे अमिश दाखवून त्यांच्या कडून १६ लाख ४४ हजार ४९९ रुपये घेऊन त्यांना नोकरीला न लावता तसेच घेतलेले पैशे परत न करता फसवणूक केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### चिमुकलीवर अत्याचार प्रकरणी सटाणा तहसील कार्यालय व पोलीस अधिकारी यांना पत्रकार संघटने तर्फे निवेदन देत तीव्र शब्दात घटनेचा निषेध वेक्त



**दैनिक युवक आधार**
**बागलाण तालुका प्रतिनिधी । दिपक गायकवाड**
**बागलाण :** मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील चिमुकली बालिकेवर झालेला अत्याचार व हत्येच्या निषेधार्थ दिनांक २० नोव्हेंबर २०२५ गुरूवार रोजी सटाणा तहसीलदार कार्यालय व पोलीस निरीक्षक कार्यालय बागलाण यांना माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समिती बागलाण आणि तालुक्यातील पत्रकार, संपादक यांनी निवेदन सादर केले

# अमरनाथ प्रायमरी स्कूल, चेंबूर येथे डीएलएसए मुंबईतर्फे व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम: "व्यसनमुक्त जीवना"चा विद्यार्थ्यांचा संकल्प

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** चेंबूर येथील अमरनाथ प्रायमरी शाळेत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (DLSA), मुंबई उपनगर व नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. नशा व डिजिटल व्यसनापासून विद्यार्थ्यांना दूर ठेवणे, त्याचे शारीरिक-मानसिक-सामाजिक नुकसान व कायदेशीर परिणाम समजावून सांगणे, तसेच "ड्रग-फ्री इंडिया" मोहिमेचा भाग म्हणून व्यसनमुक्त जीवनासाठी शपथ घेणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता. शेकडो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.




कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव न्यायमूर्ती पवन तापडिया व माननीय सचिव, मुंबई उपनगर न्यायमूर्ती मुकुल चितळे यांच्या शुभहस्ते झाले. न्यायमूर्ती मुकुल चितळे यांनी व्यसनमुक्त जीवनाची चमकदार कल्पना रंगवताना नशा व डिजिटल व्यसनामुळे होणारे गंभीर शारीरिक, मानसिक व सामाजिक नुकसान स्पष्ट केले. न्यायमूर्ती पवन तापडिया यांनी विद्यार्थ्यांना आश्वासन दिले की, नशा, सहकाऱ्यांच्या दबाव किंवा इतर कोणत्याही संकटात अडकल्यास डीएलएसए पूर्ण गोपनीयतेने व तात्काळ मदत करण्यास तयार आहे. "तुम्ही कधीच एकटे नसाल," असे त्यांनी सांगितले.

नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचे कार्यकारिणी सदस्य तथा राष्ट्रीय प्रशिक्षक बॉस्को डिसोझा यांनी विविध व्यसनांचे दुष्परिणाम व दीर्घकालीन हानी 'जसे स्वप्ने, कुटुंब व भविष्याचे नुकसान' याबाबत सखोल मार्गदर्शन केले. ते म्हणाले, "व्यसन केवळ शरीरच नव्हे तर संपूर्ण भविष्य उद्ध्वस्त करू शकते. त्यामुळे तरुणांनी यापासून चार हात दूर राहावे." ॲड. कल्पना काणेरे यांनी नार्कोटिक ड्रग्ज आणि सायकोट्रॉपिक पदार्थ कायदा (न्दप्स) कायद्यातील कठोर तरतुदींची माहिती देत सांगितले की, "एक क्षणाची उत्सुकता तुम्हाला वर्षानुवर्षे तुरुंगात नेतील." समन्वयक विवेक साळवी यांनी सहकाऱ्यांच्या दबावाला तोंड देण्यासाठी व्यावहारिक उपाय, व्यसन टाळण्याचे मार्ग व सकारात्मक जीवनशैलीचा संदेश दिला.

कार्यक्रमाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे शेकडो विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे हात वर करून दिलेली शपथ: "मी नशांना नाही, व्यसनाला नाही तर उज्वल व निरोगी जीवनाला हो म्हणतो!" हा गर्जनासारखा संकल्प विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यांवर ठसला गेला.

कार्यक्रमाचे यशस्वी समन्वयन डीएलएसएच्या श्रीमती मनीषा चव्हाण यांनी केले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. धुमाळ सर यांनी डीएलएसएच्या संपूर्ण टीमचे मनापासून आभार मानले आणि "आजच्या काळात मुलांना याची गरज आहे," असे सांगत भविष्यात नियमित असे उपयुक्त जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत, अशी विनंती केली. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्साहाने प्रतिसाद देत नशामुक्त भविष्यासाठी नवीन संकल्प घेतला. डीएलएसएनेही "ड्रग-फ्री इंडिया" मोहिमेचा विस्तार करून आणखी शाळांपर्यंत पोहोचण्याचे आश्वासन दिले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून, व्यसनमुक्त समाजाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून ओळखला जाईल.

## मेंडका गावात शोककळा – भाजप अल्पसंख्याक सेलचे मुदखेड तालुका अध्यक्ष शेख इस्माईल मेहरबान यांचे निधन

**दैनिक युवक आधार**
**मुदखेड तालुका । प्रकाश गवारे :** मेंडका गावातील प्रतिष्ठित व सामाजिक कार्यात सक्रिय असलेले भारतीय जनता पक्षाच्या अल्पसंख्याक सेलचे मुदखेड तालुका अध्यक्ष शेख इस्माईल मेहरबान यांचे आज दि२०/११/२०२५ हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या अचानक जाण्याने गावात तसेच तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.



शेख इस्माईल मेहरबान हे पक्षनिष्ठ, सर्वसमावेशक विचारांचे आणि सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारे नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. अल्पसंख्याक समाजात राजकीय जागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. विविध विकासात्मक कामांत त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला होता.

निधनाची बातमी समजताच भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक क्रियाशील मंडळी तसेच नागरिक मोठ्या संख्येने त्यांच्या निवासस्थानी धाव घेतली. त्यांच्या निधनामुळे तालुक्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात एक पोकळी निर्माण झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

त्यांची अंतिम यात्रा उद्या दि २१/११/२०२५ सकाळी १० वाजता मेंडका येथून निघून स्थानिक कब्रस्तान येथे पार पडणार आहे.शेख इस्माईल मेहरबान यांच्या पश्चात परिवार, नातेवाईक, अनुयायी आणि मोठा मित्रपरिवार असा मोठा शोकाकुल परिवार आहे.ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती लाभो.

## संकेत पारवेची पोलिस दलात निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी । योगेश पालोदकर :** तालुक्यातील उपळी गावचे संकेत एकनाथराव पारवे यांची छत्रपती संभाजीनगर कारागृह पोलिस विभागात निवड झाली.संकेत पारवे हे पूर्वी एम . महाराष्ट्र सुरक्षा दलाच्या सेवेत तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत होते. स्पर्धा परीक्षेची नव्याने तयारी करण्यासाठी ते मुबई हून संभाजीनगरकडे येत असतानाच पोलिस भरतीचा निकाल लागला आणि कारागृहात निवड झाली. त्यांच्या या अनपेक्षित पण परिश्रमाच्या बळावर मिळालेल्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



कठोर अभ्यास, सातत्य, आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा यांच्या जोरावर संकेत यांनी ही उल्लेखनीय कामगिरी साधली. त्यांच्या या निवडीबद्दल कुटुंबीय, वडील एकनाथराव पारवे आई कामिनीबाई पारवे भाऊ अजिनाथ पारवे , संजय बडक, अमित शेजुळ, संजय शेजुळ, सुदाम काकडे, स्वप्नील काकडे, अभिजीत गाढे, बाळू गायकवाड,नातेवाईक, मित्रपरिवारासह ज्ञानविकास विद्यालयाच्या शिक्षकांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले. संकेत पारवेचे प्राथमिक शिक्षण उपळी येथील जिल्हा परिषद शाळेत, तर माध्यमिक चे शिक्षण महात्मा फुले विद्यालय तर उच्च माध्यमिक शिक्षण प्रगती विद्यालय सावखेडा तर सिल्लोड येथील यशवंत विद्यालयात बीकॉमचे शिक्षण पूर्ण केले.

## पैठण एमआयडीसी पोलिस ठाणे हद्दीतील विविध बँका पतसंस्था व सराफा दुकानाच्या सुरक्षिततेसाठी महत्वपूर्ण बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभाग । पैठण प्रतिनिधी । गौतम सोनवणे :** पैठण एम.आय.डी.सी पोलिस ठाण्याचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांनी दि.(२०) गुरुवार रोजी पोलिस ठाणे अंतर्गत कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये या अनुषंगाने पोलिस ठाणे हद्दीतील विविध राष्ट्रीयकृत बँकाचे मॅनेजर,पतसंस्था चालक त्यांचे मॅनेजर तसेच या परिसरातील सोने चांदीचा व्यापार करणाऱ्या दुकानदारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण बैठक बोलावली होती.




या बैठकीत बँका व त्यांचे एटीएम तसेच सोन्या चांदीचे दुकानाच्या सुरक्षा संदर्भात त्यांच्या व्यवस्थापकांनी केलेली सुरक्षा व्यवस्था,सायरन याची माहिती घेत त्यांना या ठिकाणी उच्च दर्जाची सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे, आणि बँका पतसंस्था तसेच सराफा दुकानाच्या सुरक्षा करिता त्यांच्या आसपास २४ तास शस्त्रधारी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्याविषयी सूचना करण्यात आल्या. यासोबतच यावेळी पोलिस ठाण्याचे बीट अंमलदार तसेच विविध गावचे पोलीस पाटलांची संयुकरित्या बैठक घेऊन गाव,वस्तीमधे दरोडा,रॉबरी,घरफोडी व चोरी आणि इतर कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये या अनुषंगाने सतर्कता बाळगावी. तसेच जर कोणालाही आपले गाव, वस्तीच्या परिसरात कोणी अनोळखी इसम आढळल्यास तात्काळ पोलीस स्टेशनला देण्यात यावी.गाव,वस्ती येथे वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांनी आपले मौल्यवान सोन्या चांदीचे दागदागिने व रोख रक्कम घरात न ठेवता बँक लॉकर मध्ये ठेवण्याबाबत सूचना देऊन पोलिस ठाणे हद्दीतील नागरिकांना सुरक्षित वाटावे यासाठी पोलिसांची गावागावात रात्रीची गस्त वाढवण्यात आली आहे.त्यामुळे रात्रीच्या वेळी कोणीही विनाकारण घराबाहेर पडू नये अचानक कोंबिंग ऑपरेशन राबवून कारवाई करण्यात येणार आहे. असे पैठण एम.आय.डी.सी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांनी यावेळी सांगितले.

## उमरी न.प.निवडणूक शिवसेना (शिंदे गट) प्रचाराला सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**उमरी प्रतिनिधी । रुपेशकुमार ग.श्रीरामवारन :** नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने शुक्रवार दि.21 नोव्हेंबर रोजी उमरी येथील ग्रामदैवत सद्गुरु श्रीसदानंद बाबा महाराज यांच्या समाधी मंदिरात दर्शन घेत नारळ फोडून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.यावेळी प्रभाग क्रमांक 8,9 व 10 येथे नांदेड उत्तर विधानसभा मतदार संघाचे आमदार मा.श्री बालाजीराव कल्याणकर साहेब यांच्या हस्ते शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या प्रचाराचा नारळ फुटला. नगराध्यक्ष पदाची उमेदवार व सर्व प्रभागातील नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्या सोबत प्रचारात सहभागी होऊन नागरिकांशी संवाद साधला. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेना (शिंदे गट) सर्वच उमेदवारांना विजयी करण्याचे



आवाहन मतदार बंधू भगिनींना केले. यावेळी उपस्थित नांदेड शिवसेना जिल्हाप्रमुख (द) गंगाधर बडोरे, जिल्हाप्रमुख (उ) उमेश मुंडे , जिल्हाप्रमुख (ओबीसी) मंगेश कदम ,उमरी तालुका उपप्रमुख प्रविण ढगे, शहर प्रमुख शिवाजी शिंदे, नगराध्यक्ष पदाच्या शिवसेना (शिंदे गट) उमेदवार सौ.चंद्राबाई गोटमवाड,महेश पडोळे, सौ.कांचन लोध नगरपालिका क्षेत्रातील नगरसेवक नगरसेविका पदाचे सर्व उमेदवार तसेच उमरी शहरातील माता भगिनी युवा बांधव ज्येष्ठ नागरिक तसेच शिवसेना (शिंदे गट) पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री साई सेवा मंडळाच्या ओवळे ते पनवेल – शिर्डी पदयात्रेचे खिडूकपाडा येथे जल्लोषात आगमन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :** श्री साई सेवा मंडळ ओवळे तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही १४ व्या वर्षी साईभक्तांची ओवळे - पनवेल ते शिर्डी पदयात्रा उत्साहात सुरु झाली. आज या पालखी दिंडीचे आगमन पनवेल तालुक्यातील खिडूकपाडा गावात झाल्यानंतर संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. खिडूकपाडा वासिय साईभक्त, मान्यवरांच्या उपस्थितीत या पदयात्रेतील साई भक्तांसाठी अन्नदानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी साईभक्तांकडून ओम साई राम, साईनाथ महाराज की जयच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाची सुरुवात रथ पूजनाने करण्यात आली. यावेळी खिडूकपाडा साई मंदिराचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास उर्फ आण्णा भोईर, सुरेश भोईर यांनी रथ पूजन तसेच पालखी पूजन केले. या पालखी सोहळ्याचे स्वागत ठिकठिकाणी झाले. खिडूकपाडा येथील साई मंदिराची स्थापना सन २०१० साली झाली त्यावेळेपासून



ओवळे येथून निघणाऱ्या साईंच्या पदयात्रेचे याठिकाणी आगमन होत असून याठिकाणी ग्रामस्थांच्यावतीने साईंची सेवा करण्याचे भाग्य आम्हाला दिल्याबद्दल आम्ही खिडूकपाडा ग्रामस्थ श्री साई सेवा मंडळाचे आभारी असल्याचे मत यावेळी खिडूकपाडा साई मंदिराचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास उर्फ आण्णा भोईर यांनी व्यक्त केले. यावेळी पालखी निघताना अनेक साईभक्त बंधू-भगिनींनी पदयात्रेत सामील होऊन प्रेमळ निरोप दिला.

यावेळी ओम साई राम च्या घोषणांनी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. ही पदयात्रा साईभक्तांच्या श्रद्धेचा प्रतीक असून, शिर्डीपर्यंत भाविक मोठ्या भक्तिभावाने ही यात्रा पूर्ण करणार आहेत.

## जागतिक शौचालय दिनानिमित्त जिल्ह्यात "हमारा शौचालय,हमारा भविष्य" मोहिम




**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी । योगेश पालोदकर :** छत्रपती संभाजीनगर (गुरुवार,दिनांक 20 नोव्हेंबर 2025) केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार "जागतिक शौचालय दिना"निमित्त जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) विभागामार्फत "हमारा शौचालय,हमारा भविष्य" ही विशेष मोहिम 19 नोव्हेंबर 2025 पासून सुरू करण्यात आली असून, ही मोहीम "मानवी हक्क दिना"पर्यंत म्हणजे 10 डिसेंबर 2025 पर्यंत राबविण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक अंकित यांच्या मार्गदर्शनाखाली गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार यांनी सिल्लोड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती,तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले आहे.शौचालये ही केवळ कुणी सांगितले म्हणून केलेली शोभेची वास्तू नव्हे तर आरोग्य,प्रतिष्ठा व सुरक्षिततेची हमी देणारी मूलभूत गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.या मोहिमेअंतर्गत सिल्लोड तालुक्यातील सर्व गावातील वैयक्तिक शौचालये व सामुदायिक शौचालयांची तपासणी, दुरुस्ती,देखभाल व सुशोभीकरणावर विशेष लक्ष देण्यात येणार आहे. अपूर्ण किंवा दुरुस्तीची गरज असलेली वैयक्तिक तसेच सार्वजनिक शौचालये यांची नोंद घेऊन त्यांची दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या कालावधीत शाळा, अंगणवाडी,ग्रामसभा,स्वयंसहाय्य गट,युवक मंडळे,निवृत्त सैनिक, सामाजिक कार्यकर्ते यांचा सहभाग घेऊन स्वच्छता,आरोग्य,सुरक्षित मलनिस्सारण तसेच हवामान अनुकूल स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाणार आहे.ग्रामस्थांना त्यांच्या वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांची रंगरंगोटी,सुशोभीकरण आणि नियमित देखभाल करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल.21 नोव्हेंबर ते 5 डिसेंबर या कालावधीत गावागावांत मोहिमेचे विविध उपक्रम राबविण्यात येतील.उत्तम देखभाल व सुशोभीकरण करणाऱ्या वैयक्तिक शौचालये व सामुदायिक शौचालये वापरणाऱ्या कुटुंबीयांचा अंतिम टप्प्यात विशेष गौरव करण्यात येणार आहे.10 डिसेंबर रोजी मोहिमेचा समारोप करून उत्कृष्ट शौचालय पुरस्कार जाहीर केले जातील.तरी या मोहिमेत सर्व ग्रामस्थांनी सहभागी व्हावे,असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित व जिल्हा पाणी स्वच्छता मिशनच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनुपमा नंदनवनकर यांच्या मार्गदर्शनाखाली गटविकास अधिकारी वर्ग एक पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार यांनी केले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# नगर परिषद सवात्रिक निवडणुक प्रशिक्षणास दांडी मारणाऱ्या अधिकाऱ्यांना कर्मचारीना नोटिसा बजावणार उप जिल्हा अधिकारी सुशांत शिंदे

**दैनिक युवक आधार**

**उदगीर प्रतिनिधी ( बालाजी तेलंगे ) :** नगरपरिषदेच्या होत असलेल्या निवडणुकीसाठी मतदान केंद्राध्यक्ष व इतर मतदान अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण उदगीर येथे झाले.उदगीर नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर रोजी होणार असून या निवडणुकीसाठी १४ झोनल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय ७५७ मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या सर्व अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण मंगळवारी झाले उपविभागीय उदगीर येथे प्रशिक्षणास ४९ कर्मचाऱ्यांची दांडी प्रशासनाकडून कारवाई होणार

अधिकारी सुशांत शिंदे यांनी यावेळी झोनल अधिकारी मतदान केंद्राध्यक्ष व मतदानाधिकारी यांना यावेळी प्रशिक्षण दिले. तहसीलदार राम बोरगावकर यांनी प्रास्ताविक केले निवडणूक प्रक्रियेत वारंवार होणारे बदल व अद्ययावत पणा यासाठी हे प्रशिक्षण महत्त्वाचे असल्याचे तहसीलदार राम बोरगावकर यांनी सांगितले. उपविभागीय अधिकारी तथानिवडणूक निर्णय अधिकारी सुशांत शिंदे यांनी निवडणूक प्रक्रियेच्या संदर्भाने पीपीटी प्रेझेंटेशनसह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक प्रक्रिया सुलभपणे पार कशी पडता येईल यासाठी मार्गदर्शन केले.

मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, नायब तहसीलदार संतोष गुट्टे, डी. के मोरे, विलास सोनवणे, राजश्री भोसले, सुमित्रा इलमले यांच्यासह निवडणूक कर्मचारी उपस्थित होते. धनंजय गुडसूरकर यांनी सुत्रसंचालन केले.या निवडणुकीसाठी ७५७जणांना आदेश देण्यात आले होते. त्यापैकी ४९ कर्मचारी प्रशिक्षणाला अनुपस्थित होते. अनुपस्थित कर्मचाऱ्यांना नोटीस देऊन योग्य कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत शिंदे यांनी दिली.

# संयुक्त भारत खेल फौंडेशनच्या स्पर्धेमध्ये पनवेल मधील सेवानिवृत्त पोलीस अधिकारी विनोद चव्हाण व विभा चव्हाण यांचे दैदिप्यमान सुयश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** संयुक्त भारत खेल फौंडेशन यांनी थिंपू ( भूतान) येथे १२ व्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धेत भारत, भूतान, थायलंड, म्यानमार, बांगलादेश, श्रीलंका,, नेपाळ, मलेशिया, सिंगापूर, इंडोनेशिया, आणि फिलीपाईन्स या देशातील सुमारे ७६५ खेळाडूंचा सहभाग होता. या स्पर्धेत पनवेल येथील सेवानिवृत्त पोलीस अधिकारी विनोद चव्हाण व त्यांच्या पत्नी विभा चव्हाण यांनी दैदिप्यमान सुयश मिळवले आहे.




विनोद चव्हाण हे नवी मुंबई निवृत पोलिस अधिकारी व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष आहेत आणि त्यांच्या सुविद्य पत्नी विभा विनोद चव्हाण पोलिस उप अधिक्षक, रायगड निवृत्त सेवा अधिकारी असून त्याही नवी मुंबई , निवृत संघटनेच्या उपाध्यक्ष आहेत. या पती पत्नीनी भारतीय संघातून सहभाग घेतला होता. या स्पर्धेत सिताराम न्यायनिर्गुणे निवृत पोलिस उपायुक्त, महाराष्ट्र,निवृत पोलिस संघटनेचे सह अध्यक्ष आहेत. यांनी सहभाग घेतला होता त्यांनीही सुवर्ण पदक पटकावले आहे (लाँग टेनिस ). सदर स्पर्धेत विनोद चव्हाण यांनी गोळा फेक,थाळी फेक,आणि हातोडा फेक या तीनही स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले आहे. तर विभा विनोद चव्हाण यांनी थाळी फेक व गोळा फेक या दोनही खेळात सुवर्ण पदक पटकावले आहे. त्यामुळे एक्काच घरात पती पत्नी यांनी भारताला पाच सुवर्ण पदके जिंकून दिली आहेत त्याबद्दल निवृती नंतर ही त्यांनी देशासाठी केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे तसेच नवी मुंबई तील श्री सानपाडा जेष्ठ नागरिक संघाचे सदस्य उत्तम माने यांनी ७०+ वयोगटात भारतीय संघात सहभाग घेतला होता. तसेच रायगड जिल्ह्यातील रसायनी मधील रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड पाताळगंगा मधील घनश्याम माशेलकर यांनी ५५+ वयोगटात भारतीय संघात सहभाग घेतला होता. वरील आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उत्तम माने यांनी लांब उडी थाळी फेक, व हातोडा फेक स्पर्धेत सहभागी होवून तीन सुवर्णपदके जिंकली. तर घनश्याम माशेलकर यांनी १००मी.धावणे, लांब उडी, आणि तिहेरी उडी या तीन स्पर्धेत सहभागी होवून तीन सुवर्णपदके जिंकली या सुवर्णमय कामगिरीबद्दल दोघांचेही सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# राज्य उत्पादन शुल्क नागपुर विभागाची बनावट दारू निर्मिती अवैध कारखान्यावर धडक कारवाई

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राकेश यादव**

**नागपूर:** हुडकेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत बेसा येथील रो-हाऊस, प्लॉट नं. 38 क्रिष्णा रॉयल, न्यू हनुमान नगर येथे राज्य उत्पादन शुल्क नागपूर विभागाने बनावट देशी-विदेशी दारु निर्मितीच्या अवैध कारखान्यावर छापा टाकून धडक कारवाई केली. या ठिकाणी छाप्यामध्ये बनावट देशी / विदेशी दारुचा कारखान्यासह मुद्देमाल जप्त करण्यात आला. राज्य उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपआयुक्त गणेश पाटील, तसेच राज्य उत्पादन शुल्क नागपूरचे अधीक्षक सुरजकुमार रामोड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई 18 नोव्हेंबर रोजी



करण्यात आली. यात विभागिय भरारी पथकाचा समावेश होता. बेसा येथील घटनास्थळी छापा टाकल्यानंतर येथे आढळून आलेले बनावट देशी / विदेशी दारु व तयार करण्याकरिता वापरलेले स्पिरीट 200 लीटर, विदेशी दारुचा तयार ब्लेंड 175 लीटर, बनावट देशी दारु 513 बल्क लिटर, देशी दारु तयार करण्यासाठी लागणारे इसेन्स 10 लीटर, बनावट रॉकेट देशी दारु नावाचे कागदी लेबल, जिवंत पत्री बुचे रिकाम्या बाटल्या, बनावट रॉयल स्टॅग विदेशी दारुचे जिवंत प्लॉस्टीक बुचे, रिकाम्या बाटल्या, एक दुचाकी वाहन व इतर साहीत्य असे एकूण 11,93,082/- रूपये किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. या धडक कारवाईत मनिष नंदकिशोर जयस्वाल वय 48 वर्ष, विशाल शंभू मंडळ वय 28 वर्ष यांना या गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आली आहे. इतर फरार आरोपींचा शोध सुरु आहे. सदर कारवाई विभागीय भरारी पथकाचे निरीक्षक दशरथ क्षीरसागर, दुय्यम निरीक्षक, जगदीश यु पवार, मिलींद व लांबाडे, तसेच मंगेश कावळे निरीक्षक, दुय्यम निरीक्षक अमित. वा. क्षिरसागर, बळीराम ईथर यांनी सहकार्य केले. जवान सर्वश्री गजानन राठोड, राहुल सपकाळ, सुधीर मानकर, किरण वैध, सचिन आडोळे, विनोद डुंबरे यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली. सदरील गुन्हयाचा पुढील तपास निरीक्षक श्री. दशरथ क्षीरसागर निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, विभागीय भरारी पथक नागपूर विभाग, नागपूर हे करीत आहेत.

सध्या महाराष्ट्र राज्यातील देशी / विदेशी मद्याच्या किमतीत वाढ झालेली असून त्याकारणास्तव तुलनेने स्वस्त असलेले मद्य परराज्यातून अवैधपणे आयात होण्याची तसेच बनावट दारु निर्मिती करुन त्याची विक्री होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर मद्य हे विषारी व आरोग्यास हानीकारक असू शकते. अशी मद्याची आयात व विक्री करणे ही बाब महाराष्ट्र दारुबंदी कायदा 1949 नुसार शिक्षा/दंडास पात्र आहे.अवैद्य मद्य निर्मिती, विक्री, वाहतुक या संदर्भात कोणतीही तक्रार असल्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या टोल फ्री क्र. 18002339999 व व्हॉटस ॲप. 8422001133 यावर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाने केले आहे.

# पेडपल्मोकॉन २०२५ कार्यशाळांना नागपुरात उत्साहपूर्ण प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर**

बालश्वसन विकार परिषद (PedPulmocon 2025) अंतर्गत आयोजित परिषद पूर्व कार्यशाळा २१ नोव्हेंबर २०२५ रोजी नागपूरमधील विविध रुग्णालयांत यशस्वीरीत्या पार पडल्या. देशभरातील बालरोग तज्ज्ञ आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग नोंदवला गेला. या उपक्रमाचे आयोजनाध्यक्ष डॉ. विनोद गांधी आणि आयोजन सचिव डॉ. शिल्पा हजारे होत्या.

एकूण दहा विशेष, प्रात्यक्षिकांवर आधारित कार्यशाळा घेतल्या गेल्या.

यात लवचिक दूर्बीण अवलोकन (फ्लेक्सिबल ब्रॉन्कोस्कोपी), CF & PCD, पल्मनरी इमेजिंग, पल्मनरी फंक्शन टेस्ट, स्लीप आणि NIV, अपर एअरवे केअर, अस्थमा ट्रेनिंग, राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन संहिता (NTEP) अपडेट्स, कोशिकांना प्राणवायू पुरवठा (DOT) (Delivery of Oxygen to Tissues) आणि RTI पल्स या विषयांचा समावेश होता.



ह्या कार्यशाळा गेटवेल हॉस्पिटल, मॅक्स हॉस्पिटल, कलर्स हॉस्पिटल, एम्स नागपूर, न्यू एरा हॉस्पिटल, हेल्थ सिटी हॉस्पिटल, किम्स–किंग्सवे, लता मंगेशकर हॉस्पिटल शालिनीताई मेघे हॉस्पिटल आणि प्राइड हॉटेल येथे संपन्न झाल्या.

राष्ट्रीय आणि स्थानिक तज्ज्ञांनी प्रात्यक्षिके, केस-आधारित चर्चा आणि अद्ययावत कार्यपद्धती द्वारे सहभागींना मार्गदर्शन केले, ज्याला उपस्थितांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.

आयोजन समितीने सर्व सहकार्य करणाऱ्या संस्था, तज्ज्ञ आणि प्रतिनिधींप्रति कृतज्ञता व्यक्त केली आणि या शैक्षणिक उपक्रमाचे यशस्वी आयोजन शक्य केल्याबद्दल आभार मानले.

# काले येथील कुस्ती मैदानात सतपाल सोनटक्के कडून धनाजी कोळी डंकी डावावर चित्रपट

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** काले तालुका कराड येथील व्यंकनाथ देवाची यात्रेनिमित्त राष्ट्रीय काँग्रेसचे सरचिटणीस श्री नानासाहेब पैलवान व मित्रपरिवार यांच्या वतीने जंगी कुस्त्यांचे मैदान आयोजित केले होते. मैदानात ६५ चटकदार कुस्त्या झाल्या. अकलूजच्या सतपाल सोनटक्के कडून माळशिरस च्या धनाजी कोळी डंकी डावावर चित्रपट करून एक लाखाचे बक्षीस जिंकले. कुस्तीप्रेमींची वाहवाच्या आवाजाने काले मैदान दुमदुमले.

मुंबई येथील चंद्रभागा रुलर्स अँड डेव्हलपर्सचे चेअरमन श्री दीपक शेठ लोखंडे यांच्या सौजन्याने प्रत्येकी एक लाख रुपये देण्यात आले. या कुस्ती मैदानात खासदार श्रीनिवास पाटील, प्रदेश युवक काँग्रेस श्री शिवराज मोरे, माजी विरोधी पक्षनेते श्री जयंतराव जगताप व संयोजक श्री नानासाहेब पाटील यांच्या हस्ते सतपाल सोनटक्के व धनाजी कोळी यांची कुस्तीस प्रारंभ झाला.

कुस्ती मैदानात पुरस्कारांची परंपरा जपून महाराष्ट्र केसरी संजय पैलवान यांच्या स्मरणार्थ श्री सचिन कळंत्रे यांच्या सौजन्याने श्री खासदार श्रीनिवास



पाटील यांच्या हस्ते नामदेवराव मोहिते यांना कुस्ती भूषण, दिघंची येथील महाराष्ट्र चॅम्पियन श्री ज्ञानेश्वर दंगे यांना आदर्श वस्ताद, प्राचार्य धनाजी काटकर यांना कुस्तीप्रेमी, विंगचे उपसरपंच श्री सचिन पाचुते यांना आदर्श सरपंच, श्री रामदास शिंगारे यांना आदर्श उद्योजक, श्री अभिजीत लोहार यांना युवा उद्योजक, जिल्हा हिवताप अधिकारी डॉक्टर संजय कुंभार यांना आदर्श डॉक्टर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

काले कुस्ती मैदानात श्री नानासाहेब पाटील व मित्रपरिवार यांच्या वतीने यशस्वी मैदान पार पडले. कुस्ती क्षेत्रातून आयोजकांचे कौतुक केले जात आहे.

# संविधानाविषयी किती लोकांच्या मनात प्रेम? : डॉ. श्रीपाल सबनीस

## संविधानाचे प्रचारक सुशील बोबडे यांचा संविधानरत्न पुरस्काराने गौरव

**दैनिक युवक आधार**

**पुणे / प्रतिनिधी :** मायभूमीविषयी प्रत्येकाच्या मनात प्रेम आहे त्याचबरोबरीने राष्ट्रध्वजाचाही सन्मान होत आहे; पण संविधानाविषयी किती लोकांच्या मनात प्रेम आहे? मतांच्या मोबदल्यात जनता विकली जाणार असेल तर संविधान जागर कशासाठी? असे प्रश्न उपस्थित करीत देश संविधान साक्षर होण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले.




भारतीय संविधान दिनानिमित्त भारतीय संविधान संवर्धन व संरक्षण समितीतर्फे संविधानाचे प्रचारक सुशील बोबडे यांचा (दि. २० नोव्हेंबर २०२५ ) संविधानरत्न पुरस्काराने गौरव करण्यात आला. पुरस्काराचे वितरण डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी रमाई महोत्सवाचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर होते. कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक विठ्ठल गायकवाड, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते ॲड. अभय छाजेड, डॉ. गौतम बेंगाळे, मौलाना सुलतान शेख, लता राजगुरू मंचावर होते. तिरंगी शाल आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

सर्वच राजकीय पक्षांनी लोकशाहीचा बोऱ्या वाजविला आहे. सत्ता आणि संपत्ती अशा स्वार्थी भावनेतून राजकीय पक्षांची वाटचाल सुरू आहे, असे सांगून डॉ. श्रीपाल सबनीस पुढे म्हणाले, हर घर तिरंगा ही पंतप्रधानांची भूमिका एकतर्फी आहे. राष्ट्रभक्तीच्या या प्रयोगात संविधान का नाही? वैचारिक भ्रष्टाचार, जातीवाद, डावे-उजवे, धर्मांधता ही संविधानाला अमान्य आहे. शालेय अभ्यासक्रमात संविधानाचा समावेश व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना सुशील बोबडे म्हणाले, देशासाठी त्याग केला पाहिजे या भूमिकेतून देशाच्या कानाकोपऱ्यात सायकलद्वारे फिरून संविधानाविषयी जागृती करीत आहे. आतापर्यंत नऊ हजार कि.मी. प्रवास झाला असून संविधानाविषयी लोकांशी संवाद साधत आहे. प्रामाणिक प्रयत्नामुळे पुरस्कार मिळाला आहे, अशी माझी भावना आहे.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ॲड. प्रमोद आडकर म्हणाले, संविधानाला अपेक्षित कार्याद्वारे समाजाला दिशा देण्याचे कार्य विविध उपक्रमांद्वारे सुरू आहे. कार्यशील व्यक्तीला पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे, याचे समाधान आहे.

ॲड. अभय छाजेड, मौलाना सुलतान शेख यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल गायकवाड यांनी केले तर आभार लता राजगुरू यांनी मानले.

# आजीवली येथील कै.जनार्दन पाटील ( आप्पा) यांचे अस्मित दु:खद निधन व ग्रंथ वाचन , भजनांजली कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** आजीवली तालुका पनवेल येथील श्री. संतोष जनार्दन पाटील ( ग्रामपंचायत सदस्य) यांचे वडील कै. जनार्दन पाटील ( आप्पा )यांचे मंगळवार दि .१८-११-२०२५ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.आप्पा जरी देहाने आपल्यातुन निघुन गेले असले तरी आठवणींनी सतत आपल्या सोबत आहे.

कै. जनार्दन नामदेव पाटील यांच्या स्मरणार्थ ग्रंथ वाचन व भजनांजली कार्यक्रम होणार आहेत. दिनांक २०- ११ - २०२५ रोजी सायंकाळी ६.०० ते ८.०० वाजेपर्यंत ग्रंथ वाचन ह. भ.प.जगदीश महाराज सारडेकर व रात्री ९.०० ते ११.०० वाजेपर्यंत हनुमान प्रसादिक भजन मंडळ (आजीवली), दिनांक २१- ११ - २०२५ रोजी सायंकाळी ६.०० ते ८.०० वाजेपर्यंत ग्रंथ वाचन ह.भ. प.जनार्दन महाराज पाटील (आष्टे ) व रात्री ९.०० ते ११.०० दत्त माऊली भजन मंडळ (भातान),दिनांक २२- ११ - २०२५ रोजी सायंकाळी ६.०० ते ८.०० वाजेपर्यंत ग्रंथ वाचन ह.भ. प. नामदेव महाराज माळी (आजीवली) व रात्री ९.०० ते ११.०० जय हनुमान प्रसादिक भजन मंडळ (भातान),दिनांक २३- ११ - २०२५ रोजी सायंकाळी ६.०० ते ८.०० वाजेपर्यंत ग्रंथ वाचन ह.भ. प. लक्ष्मण महाराज म्हस्कर (मोहे) व रात्री ९.०० ते ११.०० वाजेपर्यंत विठ्ठल रुक्माई भजन मंडळ (लोणीवली),दिनांक २४- ११ - २०२५ रोजी सायंकाळी ६.०० ते ८.०० वाजेपर्यंत ग्रंथ वाचन ह.भ. प. अरुण महाराज (बेलवली)व रात्री ९.०० ते ११.०० वाजेपर्यंत गावदेवी भजन मंडळ (आरवली),दिनांक २५- ११ - २०२५ रोजी सायंकाळी ६.०० ते ८.०० वाजेपर्यंत ग्रंथ वाचन ह.भ. प. सुरेश महाराज पाटील (कोन)व रात्री ९.०० ते ११.०० वाजेपर्यंत विठोबा प्रसादिक भजन मंडळ (केरे),दिनांक २६ ११ - २०२५ रोजी सायंकाळी ६.०० ते ८.०० वाजेपर्यंत ग्रंथ वाचन ह.भ. प. सुरेश महाराज पाटील(बेलवली)व रात्री ९.०० ते ११.०० वाजेपर्यंत जय हनुमान विठ्ठल रुक्माई भजन मंडळ (ऊसर्ली),दिनांक दिनांक २६ ११ - २०२५ रोजी सायंकाळी ६.०० ते ८.०० वाजेपर्यंत ग्रंथ वाचन ह.भ. प. सुरेश महाराज पाटील(बेलवली)व रात्री ९.०० ते ११.०० वाजेपर्यंत जय हनुमान विठ्ठल रुक्माई भजन मंडळ (ऊसर्ली), दिनांक २७-११-२०२५ रोजी ग्रंथ वाचन ह भ प संतोष महाराज सते(भातान ) व जय हनुमान भजनी भारुड मंडळ (बोर्ले ) , दिनांक २८- ११ - २०२५रोजी ९.०० ते ११.०० वाजेपर्यंत माऊली कृपा प्रसादिक भजन मंडळ ( पाली खुर्द), दिनांक २९- ११ - २०२५ रोजी सायंकाळी ६.०० ते ८.०० वाजेपर्यंत ह.भ .प .सुप्रियाताई भालेकर (वाजे चेरवली) यांचे कीर्तन होणार आहे. तसेच दशक्रिया विधी गुरुवार दिनांक २७- ११ -२०२५ रोजी श्री क्षेत्र नाशिक येथे होणार आहे . रविवारी दिनांक २९- ११ -२०२५ रोजी ९.०० ते ११.०० जागर भजन (आजवली ) पंचक्रोशी यांचे होईल व रविवार दिनांक ३० -११ -२०२५ रोजी १० ते ११ प्रवचन ह भ प संदीप महाराज यादव (आसरेवाडी) यांच्या होणार आहे.आप्पांची अतिशय साधी राहणी , मनमिळाव स्वभाव, चेहऱ्यावर नेहमी स्मितहास्य असायचे. आपल्या दोन्ही मुलांना शिक्षण दिले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. आप्पाना दुःखीत अंतकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली



# ॲग्रो व्हिजन हा ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा त्रिवेणी संगम

## केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संपादक नागपूर विभाग सतीश कडू**

ॲग्रो व्हिजन हा ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा त्रिवेणी संगम असून कृषी संशोधन संस्था , खाजगी उद्योग आणि कृषी विद्यापीठ यांना एकत्र आणून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठीचा एक उत्तम मंच आहे असे प्रतिपादन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज नागपूर मध्ये केले .विदर्भातील शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाची, जोडधंद्यांची माहिती व्हावी त्याचा उपयोग त्यांच्या उत्पन्न वाढीसाठी व्हावा आणि त्यांची शेती लाभदायक व्हावी या हेतूने, केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 16 त्या ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन आज शिवराज सिंग चौहान यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते . याप्रसंगी ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी , महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, सहकारिता राज्यमंत्री. डॉ . पंकज भोयर, एनडीडीबीचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक डॉ . मिनेश शाह प्रामुख्याने उपस्थित होते .

आज पासून ते 24 नोव्हेंबर पर्यंत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अमरावती रोड वरील मैदानावर सुरु झाले असून सकाळी 11 ते 6 वाजेपर्यंत हे कृषीप्रदर्शन खुले राहणार असून शेतकऱ्यांसाठी कार्यशाळांची वेळ दुपारी 12 ते सायंकाळी 5 आहे.

या उद्घाटन सत्राला संबोधित करताना केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी सांगितले की , प्रधानमंत्री पिक विमा योजनेमध्ये आता शेतामध्ये पाणी साचल्यास तसेच रानटी पिकामुळे होणाऱ्या नुकसानाचा देखील समावेश करण्यात आला आहे .केंद्र शासन नागपुरामध्ये 'क्लीन प्लांट सेंटर 'च्या माध्यमातून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना चांगली रोपे उपलब्ध होण्यासाठी रोपवाटिका यांना अर्थसहाय्य करत आहे .मोठ्या रोपवाटिकांना 4 कोटी तर मध्यम आकाराच्या रोपवाटिकांना 2 कोटी अर्थसाहाय्य देऊन शेतकऱ्यांना रोगमुक्त रोपे या क्लीन प्लांट सेंटरच्या माध्यमातून वितरित केले जातील असे त्यांनी सांगितले .वैज्ञानिकांना शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्याची गरज असून 'लॅब टू लँड ' यासाठी केंद्र सरकारने कृषी वैज्ञानिकांना कृषी विस्तार उपक्रम राबवायला सांगत असल्याचे चौहान यांनी नमुद



केले .शेतीमध्ये यांत्रिकीकरणाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की मशीन शेतकऱ्यांना घेता येतील अशा क्षमतेच्या बनवाव्यात .ज्या शेतकऱ्यांना अशा मशीन घेता येत नाही त्यांच्यासाठी हायरिंग सेंटरची सुविधा देखील निर्माण करण्यात येईल अशी माहिती त्यांनी दिली .

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला मार्गदर्शन करताना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले की शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यास पाणी आणि खताचा पुरेपूर वापर तसेच बचत करून शेतकऱ्यांना आपले उत्पन्न वाढवता येईल . संत्रा , तुर ऊस या पिकांना संभाव्य रोग आणि कीड व्यवस्थापनापासून हे तंत्रज्ञान लाभदायक ठरेल असे देखील गडकरी यांनी यावेळी स्पष्ट केले . .शेतकऱ्यांनी उत्पादन खर्च कमी करून त्याचप्रमाणे रासायनिक खताचा वापर कमीत कमी करून मध्यस्थांना हटवून त्याच्या कृषीमालांचे विपणन केल्यास त्यांना लाभ होईल असे गडकरी यांनी स्पष्ट केले .पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्हा किंवा सांगली कोल्हापूर जिल्ह्यात जे दूध उत्पादन सरासरी 90 लाख लिटर प्रति दिवस असते ते संपूर्ण विदर्भाच्या 11 जिल्ह्यात केवळ 25 लाख लिटर आहे ही स्थिती बदलण्याकरिता शेतकऱ्यांनी शेतीसोबत पशुपालन तसेच दुग्ध व्यवसाय जोडधंदाची कास धरणे आवश्यक आहे असे गडकरी यांनी आवर्जून सांगितले .मदर डेअरीच्या माध्यमातून जर काऊ फार्म तयार झाले तर विदर्भात दुग्ध क्रांती होईल .विदर्भातील दुग्ध उत्पादन आणि संत्रा उत्पादनामुळे नागपूरची संत्रा बर्फी सुद्धा जगभरात पोहोचेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला .

राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की सलग पंधरा वर्षापासून सुरू असलेल्या ॲग्रविजन मध्ये मार्गदर्शन मिळवून शेतकऱ्यांनी आपल्या शेतीमध्ये तसेच पीक पद्धतीमध्ये बदल घडवून आणावेत .राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी राबवलेल्या विविध योजनांची माहिती देखील त्यांनी दिली .संत्र्यांच्या रोपवाटिकेसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य राज्य शासन करेल तसेच यासंदर्भात बैठकीसाठी सुद्धा त्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना आश्वासन दिले .

, 21 ते 24 नोव्हेंबर दरम्यान दररोज कृषी शाळांचे आयोजन या कृषी प्रदर्शनामध्ये करण्यात आले आहे . 'डेअरी-चारा व्यवस्थापन, नवीन तंत्रज्ञान आणि प्रक्रिया' 'तेलबिया अभियानाशी संबंधित मधमाशी पालना'वरील राष्ट्रीय परिषद ,कृषी क्षेत्रातील स्टार्टअप 'ऊस लागवड, व्यवस्थापन व नवीन तंत्रज्ञान 'फार्मर प्रोड्युसर ऑर्गनायझेशन' ,शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा 'लिंबूवर्गीय फळांचे उत्पादन आणि प्रक्रिया तंत्रज्ञान' , तसेच अन्नप्रक्रिया उद्योग या विषयावर देखील परिषद आयोजिण्यात आली आहे.

या चार दिवसीय कृषी प्रदर्शनाच्या समारोप कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी,मुख्यमंत्री. देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती राहणार आहे. याशिवाय हरियाणाचे . मुख्यमंत्री नायक सिंग सैनी उपस्थित असतील. अनेक खाजगी संस्थांसह आयआयटी खरगपूर,डॉ . पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ पीडीकेव्ही अकोला यासारख्या शैक्षणिक संस्थांचादेखील सहभाग या प्रदर्शनात असूनएमएसएमई आणि एग्रीकल्चर स्टार्टअप साठी देखील दालने आहेत. या प्रदर्शनाला भेट देण्यासाठी मोठ्या प्रमाणात शेतकरी ,विद्यार्थी नागरिक तसेच उद्योजक येत आहेत .

# बोथली च्या सुनेचा पुण्यात साहित्य दरबारात सन्मान मोहगाव देवी

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे** : भंडारा-मोहाडी तालुक्यातील बोथली या छोटास्या गावातील रहिवासी भारती तितीरमारे यांना दिनांक 16 नोव्हेंबर ला पुणे येतील क्रांतीज्योती सावित्री बाई फुले सभागृहात शिंधु ताई सपकाळ आदर्श साहित्यिका म्हणून गौरविण्यात आले. कथा कादंबरी नाटक कविता लेखना द्वारे त्यांनी केलेल्या जनजागृती कार्या साठी हा पुरस्कार आहे. श्रपित कस्तुरी ढसाललेली भिंत कथा संग्रहाच्यामाध्यमातून स्त्री मुक्तीची चळवळ उभारण्याचे कार्य त्यांनी केल. भारती तितीरमारे बोथली येतील माजी सरपंच कैलास तितीरमारे यांच्या पत्नी आहेत.वडील ह. भ. श्री. चक्रधर रेहपाडे महाराज



यांची शिकवण यांच्या जीवनात मोलाची ठरली. या खेडे गावात राहून सुद्धा आपले छन्द आणि कौशल्य जोपसावेत असा संदेश सौ भारती कैलास तितीरमारे यांनी आपल्या सारख्या असंख्य गृहिणीनां दिला यांनी केलेल्या कार्या बद्दल परिसरातुन शुभेच्छा चा वर्षाव होत आहे.

# पनवेल मनपा निवडणुकीसाठी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळा- पत्रकानुसार पनवेल महापालिकेने प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या तयार केल्या आहेत. अखेर आज या प्रारूप याद्या महापालिकेच्या प्रभाग कार्यालयांमध्ये सकाळी ११ वाजता प्रसिद्ध करण्यात आल्या.

महापालिका प्रशासनाने राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार प्रभाग रचना तयार केली. त्यानंतर निवडणुकीसाठी आरक्षण सोडत काढली. या सोडतीसोबतच महापालिका



निवडणूक विभागाने प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करण्याचे कामही सुरू केले होते. २० नोव्हेंबर रोजी यादी प्रसिद्ध करण्याबाबत सुधारित वेळापत्रक काढले. आयोगाच्या तारीख पे तारीखकडे इच्छुकांचे लक्ष लागले होते. आयोगाने हेच वेळापत्रक कायम ठेवले आहे. प्रभागनिहाय तयार केलेल्या प्रारूप मतदार याद्या आज सकाळी ११ वाजता सर्व प्रभागणकार्यालयांमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी वापरलेल्या मतदार याद्या महापालिकेसाठी ग्राह्य धरण्यात येणार आहेत. त्यामुळे या याद्यांची विभागणी प्रभागनिहाय करून त्या प्रसिद्ध करण्यात याव्यात, असे आदेश आयोगाने पनवेल महापालिका प्रशासनाला दिले होते. त्यानुसार ही प्रक्रिया सुरू असून, आज याद्या प्रसिद्ध होताच त्यावर सूचना हरकतींसाठी २७ नोव्हेंबरपर्यंत मुदत दिली जाणार आहे. तर प्राप्त हरकतींवर निर्णय घेऊन ५ डिसेंबरपर्यंत अंतिम याद्या प्रसिद्ध करायच्या आहेत. त्यानंतर ८ डिसेंबरपर्यंत मतदार केंद्र निश्चित करून त्या-त्या मतदार केंद्रनिहाय मतदार याद्या १२ डिसेंबरपर्यंत प्रसिद्ध करायचे आदेश आयोगाने दिले आहेत. पनवेल महानगरपालिकेतील प्रभाग समिती अ अंतर्गत उप विभाग नावडे मध्ये १,२, ३ प्रभाग, प्रभाग समिती अ कार्यालय, खारघर मध्ये ४,५,६ प्रभाग, प्रभाग समिती व कळंबोली मध्ये ७,८,९,१० प्रभाग, प्रभाग समिती क कामोठे मध्ये ११,१२,१३ प्रभाग, तर प्रभाग समिती ड पनवेल मध्ये १४,१५,१६,१७,१८,१९,२० हे प्रभाग असून त्यांची मतदार यादी निरीक्षणासाठी ठेवण्यात येणार आहे.

# माहूर येथे टिपू सुलतान जयंती उत्साहात साजरी; कववाली आणि भीम गीतांनी दुमदूमले माहूर शहर

**दैनिक युवक आधार**
**श्रीक्षेत्र माहूर:(प्रतिनिधी) सय्यद ईसा**

स्वतंत्र सेनानी व प्रगतिशील विचारवंत टिपू सुलतान यांच्या जयंतीनिमित्त माहूर शहरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून उत्साहमय वातावरणात जयंती साजरी करण्यात आली. विविध सामाजिक संघटना, युवक गट व सर्वधर्मीय नागरिकांनी मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

जयंतीनिमित्त सकाळी शहरातील टिपू सुलतान चौकात अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर टी-पॉईंटपर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत ढोल-ताशे पथक, बॅनर, झेंडे, ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचे फलक, तसेच सामाजिक ऐक्य व राष्ट्रीय एकतेचे संदेश देणारे फलक यांचा विशेष समावेश होता. नागरिकांनी मार्गावरून फुलांचा वर्षाव करत



मिरवणुकीचे स्वागत केले.

मिरवणुकीदरम्यान जयंती मंडळातर्फे उपस्थित मान्यवर, अधिकारी तसेच पोलीस प्रशासन यांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या माध्यमातून शांती, बंधुता व सामाजिक सलोखा राखण्यासाठी सर्व घटकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

संपूर्ण कार्यक्रमादरम्यान प्रशासन व स्वयंसेवकांनी चोख बंदोबस्त ठेवत वाहतूक व्यवस्थापन सुरळीत केले. शहरभर प्रकाशयोजना, फलक आणि आकर्षक सजावट करण्यात आली होती. जयंती कार्यक्रमामुळे माहूर शहरात उत्साह, ऐक्यभाव आणि सांस्कृतिक विविधतेचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

# दिवा प्रभाग समिती डम्पिंग च्या शोधात

## ठा.म.पा. च्या हलगर्जी पणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**दैनिक युवक आधार**
**रमेश राऊत । कल्याण ग्रामिण प्रतिनिधी**

**ठाणे :** दिवा प्रभाग समितीच्या अंतर्गत असलेले डम्पिंग ग्राउंड बंद केल्याने परिसरात सर्वीकडे कचऱ्याचे साम्राज्य पसरलेले दिसून येत आहे कचरा टाकण्यासाठी डम्पिंग ग्राउंड उपलब्ध नसल्याने दिवा प्रभाग समिती अंतर्गत येणाऱ्या परिसरातून कचरा उचलणाऱ्या घंटागाडी गेल्या पंधरा दिवसापासून बंद करण्यात आल्या आहेत.त्यामुळे रस्त्याच्या कडेला आणि इतरत्र सर्वीकडे कचरा जमा झाल्याचे दिसून येत आहे या कचऱ्याच्या दुर्गंधीने स्थानिकांच्या आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. दिवेकरांच्या मागणीनुसार काही वर्षांपूर्वी दिवा डंपिंग बंद करण्यात आला आहे,त्यानंतर भंडार्ली येथे भाडे तत्वावर घेतलेले डम्पिंग ग्राउंड भाडेकरार संपल्यानंतर आणि तेथील नागरिकांच्या वाढता विरोध लक्षात घेऊन तोही बंद करण्यात आला होता, नंतर हा सर्व कचरा डायघर येथील डम्पिंग मध्ये टाकण्यात येत होता डायघर डम्पिंग चालू झाल्यानंतर डायघर गाव आणि आसपासच्या स्थानिक रहिवाशांनी या डम्पिंगला कडाडून विरोध केला होता काही दिवसापूर्वी नागरिकांचा विरोध आणि येणाऱ्या महानगर पालिकेच्या निवडणुका याचे गांभीर्य लक्षात घेऊन काही नेते मंडळींनी डायघर डम्पिंग बंद करण्याचा निर्णय घेतला पण हा निर्णय घेण्याच्या अगोदर पर्यायी डम्पिंगची व्यवस्था न केल्याने कचरा टाकण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे कचरा टाकायला जागा नसल्यामुळे दिवा प्रभाग समिती अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागातील कचरा न उचलण्याचा निर्णय येथील अधिकाऱ्यांनी घेतला आहे.



# रेल्वे पोलिसांवर गुन्हे दाखल करून डिवायएसपीला सह आरोपी करा; रेल्वे स्टेशन परिसरात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे निदर्शने

## (विद्यार्थ्यास हातकडी लावून फोन पे द्वारे पैसे घेतल्याचे प्रकरण, तपास अधिकाऱ्यांनी अहवाल बदलून प्रकरण निकाली काढले)

**दैनिक युवक आधार**
**माहुर : (प्रतिनिधी)सय्यद ईसा**

मजदूर युनियनचा कार्यकर्ता तथा माकपचा सभासद असलेल्या मंगेश या विद्यार्थ्यास रेल्वे पोलिसांनी बेकायदेशीररित्या अटक करून, हातात हातकडी लावून पाच तास डांबून ठेवले होते. रात्री ३ वाजता फोन पे द्वारे ५ हजार रुपये बळजबरीने इतर खाजगी व्यक्तीच्या नावावर वळवून घेत सोडून दिले होते. मंगेश वट्टेवाड हा महाविद्यालयीन विद्यार्थी असून अर्धवेळ काम करून शिक्षण घेत आहे. विशेष म्हणजे घटना घडली तेव्हा तो नांदेड रेल्वे स्टेशन येथे वाटरिंगचे काम करीत होता. मोटारसायकल पार्किंग मध्ये लावण्याच्या कारणावरून त्याला जातीवाचक शिवीगाळ करीत अपमानित करून पाच तास हातकडी लावून पेटीला बांधून ठेवले होते. त्या पीडित विद्यार्थ्यांने नांदेडचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, वजीरबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक, राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे, लोहमार्गचे पोलीस अधिकारी, डीआरएम आदीना निवेदने देऊन गुन्हेगार पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. तीन आंदोलनात दोषींवर कारवाई करून अटक करण्याची व सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी देखील करण्यात आली. आज घडीला देखील पीडित विद्यार्थी जिल्हाधिकारी कार्यालया समोर साखळी उपोषण करीत आहे.

मागील सहा महिन्यापासून कारवाईसाठी टाहो फोडत आहे.दोन वेळा लेखी जबाब दिला. परंतु अद्याप कारवाई झाली नाही. पोलीस उप विभागीय अधिकारी (लोहमार्ग) श्री संजय लोहकरे यांनी गुन्हेगारांना वाचविण्यासाठी खोटा तपासणी अहवाल तयार करून प्रकरण निकाली काढले असल्याचे घोषित केले आहे. एकंदरीत तक्रारीत नमूद ३-४ पोलीस कर्मचारी राजरोसपने लूटमार करतात अशी जोरदार चर्चा असून यातील एक पोलीस कर्मचारी जबरी चोरीच्या गुन्ह्यात मध्यवर्ती कारागृहात न्यायालयीन कोठडी भोगत आहे.

या गुन्हेगारांना वाचविण्यासाठी खोटा अहवाल तयार करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांना सह अरोपी करावे अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व पीडित विदयार्थ्यांनी केली आहे. ज्याच्या फोनपे वर मध्यरात्री ३ वाजता ५




हजार रुपये बळजबरीने वळवून घेतले आहेत तो खाजगी व्यक्ती फिर्यादी व पीडित विद्यार्थी मंगेश चा मित्र असल्याचे डिवायएसपी श्री लोहकरे यांनी आपल्या अहवालात सुस्पष्ट लिहले असून फिर्यादी त्यास कसल्याही प्रकारे ओळखत नाही.

या प्रकरणाची सीआयडी चौकशी करावी. संबंधित आरोपी पोलीस कर्मचारी, तपास अधिकारी श्री लोहकरे यांची ब्रेनमॅपिंग चाचणी करावी आणि प्रकरण भापोसे दर्जाच्या अधिकाऱ्याकडे देऊन पुन्हा तपास करून दोषींवर कायदेशीर कार्यवाही करावी ही मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या कडे व त्यांच्या मार्फत राज्य आणि केंद्र सरकार कडे करण्यात आली आहे.उपरोक्त प्रकरणी कायदेशीर कार्यवाही करावी म्हणून माकप च्या वतीने २१ नोव्हेंबर रोजी नांदेड रेल्वे स्टेशन पोलीस ठाणे समोर निदर्शने करण्याची रीतसर नोटीस दिली असता.पोलीस निरीक्षक श्री प्रकाश वाघमारे यांनी माकप सचिव कॉ.गंगाधर गायकवाड आणि पीडित विद्यार्थी कॉ.मंगेश वट्टेवाड यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६८ अन्वये बीएनएसएस १६८ अंतर्गत नोटीस दिली व रेल्वे स्टेशन येथील पोलीस स्टेशन परिसरात निदर्शने आंदोलन करण्याची परवानगी नाकारली आहे. शिवाय रेल्वे सार्वजनिक मालमतेचे तसेच प्रवासी व त्यांच्या समानाच्या सुरक्षेत बाधा निर्माण होण्याची आणि रेल्वेची हानी व नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने निदर्शने करण्यास परवानगी नाकरण्यात येत असल्याचे लेखी कळविले आहे.रेल्वे गाड्यांच्या आगमनात व प्रवाश्यास बाधा निर्माण झाल्यास किंवा रेल्वे प्रवाश्याच्या जीवितास धोका झाल्यास किंवा इतर संज्ञय अपराध घडल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील व आपल्यावर प्रचलित कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल असे नोटीस द्वारे कळविले आहे. नांदेड रेल्वे स्टेशन येथे प्रवास्यांना लुटणारी मोठी टोळी कार्यरत असून या टोळीमध्ये काही निवडक पोलीस कर्मचारी सामील आहेत असा संशय बळावला आहे.त्यामुळे या विद्यार्थी हातकडी व फोनपे द्वारे लूट प्रकरणाची सीआयडी चौकशी करण्याची मागणी मागणी घेऊन मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी मैदानात उतरली असून दि. २१ नोव्हेंबर रोजी दोन वाजता नांदेड रेल्वे स्टेशन येथे तीव्र निदर्शने करण्यात आली आहेत.निदर्शने करून निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांना निवेदन देण्यात आले असून निवेदनाच्या प्रति रेल्वेच्या महानिदेशकांना, मुख्यमंत्री व छत्रपती संभाजी नगर रेल्वे पोलीस अधीक्षक पाठविल्या आहेत.या आंदोलनाचे नेतृत्व माकप सचिव कॉ. गंगाधर गायकवाड, पीडित विद्यार्थी कॉ.मंगेश वट्टेवाड, कॉ. लता गायकवाड, कॉ.दिगंबर घायाळे,कॉ.बालाजी पाटील भोसले,सुनील भाऊ अंनतवार,कॉ. सुभाषचंद्र गजभारे, कॉ. अंबादास भंडारे,कॉ. राहुल नरवाडे, कॉ. प्रयागबाई लोखंडे आदींनी केले.

# शिंगोर्णी शाळेत 90 विद्यार्थ्यांना लेखन साहित्य व चित्रकला साहित्य केले वाटप; बँक ऑफ इंडिया चा अनोखा उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**शिंगोर्णी प्रतिनिधी(आकाश जाधव) :**

आज 18 नोव्हेंबर 2025 वार मंगळवार रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंगोर्णी येथे बँक ऑफ इंडिया चे मॅनेजर श्री शिव सर, त्यांचे सहकारी श्री बजरंग काळे सर, अक्षय मुंजे, श्री सोमनाथ काळेल शाळा व्यवस्थापन समिती शिंगोर्णी, श्री सर्जेराव शिंदे केंद्रप्रमुख कोळेगाव, श्रीमती अर्चना पवार मॅडम मुख्याध्यापिका जि प शाळा शिंगोर्णी, स्वयंपाकी श्रीमती मालन कस्तुरे काकू तसेच शिंगोर्णी शाळेचा बालचमु यांच्या उपस्थितीत चित्रकला वही, रंगीत खडू बॉक्स, शंभर पानी वही, पेन्सिल, पेन, शार्पनर, खोडरबर असे सर्व लेखन साहित्य व चित्रकला साहित्य शिंगोर्णी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.




शिंगोर्णी शाळेतील शेतकऱ्यांचा गोरगरीब मुलांना लेखन साहित्य व चित्रकला साहित्य वाटप करून बँक ऑफ इंडिया चे मॅनेजर व त्यांचे सहकारी या सर्वांनी मोलाचा हातभार लावला आहे. हा त्यांचा उपक्रम नाविन्यपूर्ण व कौतुकास्पद आहे.

बँक ऑफ इंडिया चे मॅनेजर श्री शिव सर व त्यांचे सहकारी या सर्वांचा सन्मान श्री सोमनाथ काळेल शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री सर्जेराव शिंदे केंद्रप्रमुख कोळेगाव यांच्या हस्ते श्रीफळ, फेटा,पुष्प देऊन करण्यात आला.

तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अर्चना पवार मॅडम यांनी बँक ऑफ इंडिया चे मॅनेजर श्रीशिव सर, श्री बजरंग काळे सर, श्री अक्षय मुंजे, श्री सोमनाथ काळेल व उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# मनःशक्तीने चमचे वाकवण्याचा दावा करणाऱ्या भोंदूवर कठोर कारवाई करावी : महाराष्ट्र अंनिसची मागणी

**दैनिक युवक आधार**
**विदर्भ प्रमुख प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे**

**नागपूर :** अहिल्यानगर येथील आर्ट ऑफ लिव्हिंग केंद्राच्या नावाखाली मनःशक्तीच्या जोरावर चमचे वाकवण्याचा दावा करणाऱ्या माधव गवळी या भोंदूवर तातडीने कठोर कारवाई करावी अशी मागणी महाराष्ट्र अंनिस मार्फत मधुकर अनाप, अरुण कडू पाटील, मिलिंद देशमुख, प्रा. प्रवीण देशमुख, राहुल थोरात, रामभाऊ डोंगरे, विजया श्रीखंडे, राम काळे, चित्तरंजन चौरे, इंजी. गौतम पाटील, डॉ. प्रा. सुनील भगत, देवयानी भगत, प्रा. पुष्पा घोडके, देवानंद बडगे, मंगला गाणार, विजया ठाकरे, शोभा पाटील, सुषमा शेवडे, प्रीती नगरारे, इंदू उमरे आणि इतर मान्यवर कार्यकर्त्यांनी केली आहे. अशा स्वरूपाचे निवेदन अहिल्यानगर पोलिस अधिक्षक यांना देखील देण्यात आले आहे. याविषयी प्रसिद्धी पत्रकात असे नमूद केले आहे की अहिल्यानगर येथील माधव गवळी हा व्यक्ती आर्ट ऑफ लिव्हिंग केंद्राच्या नावाच्याखाली राजरोस भोंदूगिरी करत असून त्याचे असंख्य पुरावे त्याच्या सोशल मिडियावर उपलब्ध आहेत.

या व्हिडीओमध्ये लहान मुलांचा वापर करून त्यांच्या माध्यमातून मनःशक्तीने चमचा वाकवण्यासारखे भोंदू गिरीचे प्रयोग करून दाखवले जात आहेत. अशाप्रकारे चमचा वाकवणे ही एक साधी हातचलाखी आहे. अंनिसचे अनेक कार्यकर्ते ती करून दाखवतात. त्याचा व्हिडिओ देखील प्रेस नोट सोबत दिला आहे. आर्ट ऑफ लिव्हिंग इन्ट्यूशन कोर्स केल्यावर मुलांची अंतःशक्ती वाढते आणि ती मुले चमच्याशी बोलून त्याला वाकावयला सांगतात आणि आपोआप तो चमचा वाकतो अशा स्वरूपाचे हे व्हिडीओ आहेत. हा सरळसरळ जादूटोणा विरोधी कायद्याच्या भंग असून त्यामुळे असे प्रकार राजरोस प्रकारे करणाऱ्या माधव गवळी आणि त्याच्या साथीदारांना तातडीने अटक करावी, अशी देखील मागणी या पत्रकात करण्यात आली आहे. डोळ्यावर नीट पट्टी बांधली असता कुणालाही केवळ अंतःशक्तीने वाचता येते असा दावा करणे ही सरळसरळ फसवणूक आहे. आर्ट ऑफ लिव्हिंग केंद्राच्या मार्फत हा दावा केला जातो. तसेच त्यांच्या ऑफिशियल वेबसाईटवर देखील असे व्हिडियो दिसून येतात. हातचलाखिने या गोष्टी सहज करता येऊ शकतात. त्याविषयी देखील अंनिस कार्यकर्त्यांने केलेले व्हिडीओ सोबत जोडले आहेत. आर्ट ऑफ लिव्हिंगने या विषयी आपली भूमिका स्पष्ट करावीअसे देखील या पत्रकात नमूद केले आहे.

हेमामालिनी, माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी प्राजक्ता माळी यांच्यासारखे लोक याची भोंदूगिरीची जाहिरात करत आहेत. ती त्यांनी तातडीने थांबवावी अशी देखील अपेक्षा या पत्रकात व्यक्त करण्यात आली आहे. या विषयाचे निवेदन अहिल्यानगर पोलिसांनादिले असून या विषयी महाराष्ट्र अनिसचे शिष्टमंडळ त्यांना भेटणार आहे. जादूटोणा विरोधी कायद्यानुसार अशा प्रकारे चमत्काराचा दावा करणाऱ्या लोकावर स्वतःहून कारवाई करणे हे पोलिसांचे कर्तव्य असताना देखील अहिल्यानगरच्या मध्ये राजरोस अशी भोंदूगिरी सुरू आहे. याविषयी पोलिसांनी तातडीने कारवाई करावी अशी देखील मागणी या पत्रकाच्या माध्यमातून करण्यात आली. या भोंदूगिरीला बळी पडणारे बहुतांश सुशिक्षित लोक आहेत. पुण्यात नुकत्याच एका सुशिक्षित कुटुंबाला चौदा कोटी रुपयाला फसवले असल्याची घटना घडली आहे. त्या पार्श्वभूमीवर पालकांनी आपल्या मुलांना अशा भोंदूगिरीपासून वाचवावे अशी अपेक्षा देखील या पत्रकात व्यक्त केली आहे.

**डॉ सुनिल भगत**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती**
**नागपूर**





**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर):-माळशिरस तालुक्यातील पिलीव या ठिकाणी श्री. विठ्ठल- रुक्मिणी मंदिरात प्रबोधिनी स्मार्त एकादशी, त्याचप्रमाणे उत्पत्ती एकादशी आणि ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी याचे औचित्य साधून अनेक भाविक भक्त श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदिरामध्ये दर्शनासाठी बहुगर्दी करीत असल्याचे दिसून आले. या मंदिरामध्ये सतत धार्मिक कार्यक्रम असतात. महिला भजनी मंडळ पिलीव, पुरुष भजनी मंडळ पिलीव यांचाही सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम नेहमीच होत असतो. त्याप्रमाणे वरील दिवशी सुद्धा भाविक भक्त मोठ्या श्रद्धेने दर्शन घेत असल्याचे दिसून आले.( दैनिक युवक आधार)**

# शिवशक्ती उत्कर्ष मंडळाचे माजी पदाधिकारी काशीराम सिताराम तोरस्कर यांचे दुःखद निधन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर :** रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील देवरुख शहर पासून जवळच असलेल्या मु. पो. कासार कोळवण गावचे ज्येष्ठ नागरिक व मुंबई येथील वडाळा येथे वास्तव्यास असलेले श्री शिवशक्ती उत्कर्ष मंडळाचे माजी पदाधिकारी काशीराम सिताराम तोरस्कर ( वय- ७८ वर्ष )यांचे अल्पशा आजाराने(दि. २० नोव्हेंबर २०२५)रोजी आकस्मित दुःखद निधन झाले. तरी त्यांच्या अचानक जाण्यामुळे त्यांचा परिवार वरती दुःखाचा डोंगर कोसळला आहे.त्यांचा कुटूंबाच्या दुःखात कासार कोळवण ग्रामस्थ सहभागी आहोत.ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो अशी यानिमित्ताने ईश्वर चरणी प्रार्थना करत त्यांना



भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या दुःखात संघर्ष विकास समिती,कांडकरी विकास मंडळ,श्री शिवशक्ती उत्कर्ष मंडळ,नवतरुण मित्र मंडळ व तोरस्कर बंधू परिवार व समस्त कासार कोळवण ग्रामस्थ सहभागी आहेत.

कासार कोळवण गावचे ज्येष्ठ नागरिक आणि विविध विषयांवरील तज्ज्ञ भाष्यकार काशीराम सिताराम तोरस्कर यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले आहे हे ऐकून वाईट वाटले. मृतात्म्यास चिरशांती प्राप्त होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना आणि भावपूर्ण श्रद्धांजली.कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो.स्व.आदरणीय काशीराम सिताराम तोरस्कर यांचे अनुभवसंपन्न आणि समाधानी दीर्घायुष्य नेहमीच प्रेरणादायी राहील असे मत अनेकांनी व्यक्त केले. त्यांची माती सावरणे सात दिवसाने व उत्तर कार्य रविवार दिनांक ३०/११/२०२५ रोजी गावी राहत्या घरी मु.पो.कासार कोळवण ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथे होणार आहे.त्यांच्या पश्चात पत्नी,मुलगा, दोन मुलगी, सून,नातवंडे,भाऊ,भावजई असा मोठा परिवार आहे.

# शेतकरी व जनतेला तात्काळ न्याय द्या, नसता शे.का.प., शिवसेना, काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी तिव्र आंदोलन करणार

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)**

: पाटोदा तालुक्यात विविध गावामध्ये बिबट्या दिसत आहे. या मुळे शेतकरी वर्गात सर्वत्र भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. या मुळे शेतकऱ्यांना पूर्ण क्षमतेने दिवसा लाईट उपलब्ध करून द्यावी., वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा., नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजने अंतर्गत भरपाई द्या., पाटोदा तालुक्यातील गायरान जमिनीवरील पोटखराब काढण्यात यावे., शेतकऱ्यांचे ३ हेक्टर पर्यंत जाहीर केलेले अनुदान तात्काळ देण्यात यावे., खरीप २०२५ मध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे त्यांची विमा भरपाई तात्काळ द्या., अतिवृष्टीत वाहून गेलेले किंवा मयत झालेले पशुधन यांचे नुकसान भरपाई



तात्काळ द्या. आशा विषयाचे लेखी निवेदन तहसील कार्यालय पाटोदा यांना विविध पक्षांच्या वतीने देण्यात आले आहे.या निवेदन पुढे म्हटले आहे की मा.तहसिलदार साहेबांनी वरील विषयाची गंभीर दखल घेऊन शेतकरी व जनतेला तात्काळ न्याय द्यावा नसता तिव्र आंदोलन करण्यात येईल. तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनावर भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे तालुकाप्रमुख मुकुंद शिंदे, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल जाधव, वंचित बहुजन आघाडीचे बाळासाहेब गायकवाड व शिवसेनेचे आकाश कांकरिया, वंचितचे राहुल शिरोळे यांच्या सह इतरांच्या सह्या आहेत.

# देवगाव परिसरात दहशत माजवणारा आणखी एक बिबट्या अखेर पिंजऱ्यात जेरबंद

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**देवगाव :**देवगाव व देवगाव फाटा परिसरात गेल्या काही दिवसांपासून उभे राहिलेल्या बिबट्याच्या धोक्याला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. आज पहाटे वाकद–देवगाव शिवरस्त्यावर साहेबराव बाबूराव शिंदे यांच्या शेतात साधारण चार ते पाच वर्षांचा बिबट्या वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात जेरबंद झाला. गत आठवड्यात या परिसरात पिंजऱ्यात अडकलेला हा दुसरा बिबट्या ठरला आहे.

यापूर्वी देवगाव येथे धुमाकूळ घालणारा नरभक्षक बिबट्या कैद झाल्यानंतर ग्रामस्थ, विद्यार्थी व पालकांनी त्याला ठार मारण्याची मागणी घेत रास्ता रोको आंदोलन केले होते. मात्र सहाय्यक वनसंरक्षक शिवाजी सहाणे, वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल घुगे आणि स.पो. नि. भास्करराव शिंदे यांनी आंदोलकांची समजूत काढत बिबट्याला म्हसरूळ येथील वन्यजीव संक्रमण उपचार केंद्रात हलविण्यात आले.



यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल घुगे यांनी शासनास पाठविलेल्या बिबट्या ठार मारण्याबाबतच्या पत्राची प्रत आंदोलकांना दिली. तसेच देवगाव–रुई परिसरात ड्रोन सर्व्हेक्षण करून उर्वरित बिबट्यांचा तातडीने बंदोबस्त केला जाईल, आणि भविष्यात याठिकाणी मनुष्यहानी झाल्यास वनविभाग जबाबदार राहील, असे आश्वासनही देण्यात आले.

दरम्यान, देवगाव गावात ठिकठिकाणी पाच पिंजरे तातडीने लावण्यात आले होते. तसेच बिबट्या दिसलेल्या परिसरात वनविभागाचे तब्बल २५ हून अधिक कर्मचारी रात्री दिवस सर्व्हेक्षण मोहीम राबवत होते. तरीही काही दिवसांपूर्वी एका बिबट्याने शिक्षकावर हल्ला केल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

आज पहाटे बिबट्या जेरबंद झाल्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल घुगे, वनपाल जयराम शिरसाठ, वनरक्षक विजय दोंदे, माजी सैनिक अंकुश गुंड तसेच आधुनिक बचाव पथक निफाडचे सागर दुसिंग, भारत माळी, विजय माळी, सादिक शेख, वैभव दौंड, शरद चांदोरे, मयुर गांगुर्डे, समाधान चव्हाण यांनी घटनास्थळी धाव घेऊन बिबट्याला ताब्यात घेतले.

तथापि, अद्यापही परिसरात आणखी बिबटे असल्याची नागरिकांची खात्री असून तातडीने त्यांचा बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे

# सोयगाव तालुका राष्ट्रवादी (AP) ॲक्शन प्लॅन घोषित –स्वबळावर लढणार निवडणुका

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** तालुक्यातील फर्दापूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) ची सोयगाव तालुका बैठक आज मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडली. बैठकीत पक्ष संघटन बळकटीकरण,आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि कार्यकर्त्यांची बांधिलकी यावर सविस्तर चर्चा झाली.

बैठकीदरम्यान जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका स्वबळावर लढवण्याचा ऐतिहासिक ठराव एकमुखाने मंजूर करण्यात आला.पक्षाचा विस्तार, कार्यकर्त्यांचे संघटन आणि विकासकामे जनतेपर्यंत पोहोचवण्यावर भर देण्याची दिशा या बैठकीतून देण्यात आली. बैठकीला प्रमुख उपस्थिती पक्षनिरीक्षक राहुल डकले,जिल्हा सरचिटणीस नितीन धुमाळ,तालुका अध्यक्ष सुनील साखळेयुवक तालुका अध्यक्ष दशरथ झलवारमुन्ना भाऊ ढगे,ओबीसी सेलच्या अध्यक्षा हेमा राठोड,जिल्हा उपाध्यक्ष क्षमा तडवीशेषमल



काका जाधव,सोशल मीडिया अध्यक्ष बहादुर चव्हाण,मोहन चव्हाण, पंकज थोरात, पांडुरंग थोरात,मिराबाई रवींद्र सावळे,विष्णू शिनगारे यांसह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.बैठकीत कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग दर्शवताना आगामी निवडणुकांसाठी सज्ज असल्याचा निर्धार व्यक्त केला.संघटन मजबुतीकरणासाठी धोरणात्मक मार्गदर्शन करण्यात आले.

**तालुका अध्यक्ष सुनिल साकळे यांची प्रतिक्रिया :**

“सोयगाव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)ची संघटनात्मक तयारी जोरात सुरू असून प्रत्येक गावापर्यंत पक्षाची विचारधारा पोहोचवण्याचे आम्ही लक्ष्य ठेवले आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका आम्ही नक्कीच स्वबळावर लढवणार असून कार्यकर्त्यांच्या जोरावर उत्तम यश मिळेल, याचा पूर्ण विश्वास आहे.”

# गळा दाबून दोन सख्ख्या जावांचा खून; लूटमारीची शक्यता! ;शेतात कापूस वेचणीदरम्यान घडली भीषण घटना

**दैनिक युवक आधार**
**श्रीक्षेत्र माहूर: (प्रतिनिधी) सय्यद ईसा**

माहूर तालुक्यातील पाचुंदा येथे दि 20 रोजी दुपारच्या सुमारास 5 वाजता घडलेल्या दुहेरी हत्याकांडामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. स्वतःच्या शेतात कापूस वेचणीचे काम करत असताना दोन सख्ख्या जावांचा गळा दाबून निर्घृण खून करण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेला लूटमारीचा संशयही व्यक्त केला जात असून दोन्ही सख्ख्या जावांचा खून झाल्याने पाचुंदाचा माहूर तालुक्यात खळबळ उडाली आहे,मृत महिलांची नावे अंतकलाबाई अशोक आढागळे वय 60 वर्ष अनुसयाबाई साहेबराव आढागळे वय 45 वर्षअशी आहेत. दोघीही कापूस वेचणीसाठी शेतात कामाला गेल्या होत्या. त्याचदरम्यान कुणीतरी अज्ञात व्यक्तीने गळा दाबून त्यांचा खून केल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना देण्यात आली आहे.घटना



उघडकीस येताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून तपासाची प्रक्रिया सुरू केली आहे. हत्येचे नेमके कारण अजून स्पष्ट झाले नसले तरी दोन्ही महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र गायब असल्याने लुटमारीच्या उद्देशाने सदरील खून झाल्याची चर्चा परिसरात होत आहे या दुर्दैवी व हृदयद्रावक घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये प्रचंड संताप व अस्वस्थता पसरली असून पोलीस निरीक्षक देविदास चोपडे सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके यांनी घटनास्थळाकडे धाव घेऊन घटनेची नोंद घेतली आहे

# येरगी येथे आरोग्य शिबिरात २२६ लोकांची व विद्यार्थ्यी यांची तपासणी तर १६४ विद्यार्थ्यींना शैक्षणिक साहित्य वाटप.४२ नागरिकांचे HB तपासणी

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी महादेव उप्पे :** नांदेड जिल्हाचे राज्यसभा खासदार डॉ.अजित गोपछेडे साहेब, यांच्या वाढदिवसानिमित्त देगलूर तालुक्यातील चालुक्यकालीन येरगी येथे शैक्षणिक साहित्य वाटप व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्यात एकूण २२६ जणांची तपासणी करण्यात येऊन यामध्ये उपकेंद्र येरगी येथे कुष्ठरोग शोध मोहीम राबविण्यात आली असून व तसेच संशयित रुग्णांनाची तपासणी करण्यात आली आहे. जिल्हा परिषद प्राथमिक



शाळा व अंगनवाडी येथे १६४ विद्यार्थ्यी यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आल.

सदरील शिबिराचे उदघाटन बालिका पंचायत राज सर्व टिम यांच्या हस्ते धन्वंतरी पूजनाने करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक नागोराव चव्हाण सर,आरोग्य विषय प्रमुख मार्गदर्शक उपकेंद्रचे डॉ.किरण ठाकरे मॅडम हे होते.यामध्ये कुष्ठरोग शोध मोहीम राबविण्यात आली असून व तसेच संशयित रुग्णांनाची तपासणी पोट विकार,बि.पी.शुगर तपासणी,बीपी तपासणी,सामान्य आरोग्य तपासणी,या प्रसंगी संतोष पाटील येरगीकर, तंटामुक्त अध्यक्ष सायलु कांबळे,ग्रामपंचायत सदस्य अशोक वाघमारे,विश्वनाथ बागेवार,अशोक बरसमवार, सुरेश सोमवार,अंगणवाडीचे हाणमाबाई बरसमवार, गंगामणी दारलावार,शितल मठपती,नागमणी बरसमवार, मजुळा सिलमकुटवार,बालिका पंचायत राज चे सरपंच अंजली वाघमारे,उपसरपंच पुनम सुर्यवंशी,ग्रामसेवक महादेव दाणेवार,तंटामुक्त अध्यक्ष शिवकांत भुरळे,महादेव कुंचगे,मोनिका माळगे, रुक्मिणी भुरूळे, रूद्रानी चैडके, शिबीर यशस्वी करण्यासाठी संतोष पाटील,प्रभाकर वाघमारे,इरवंत कालिंगवार,माधव ईज्जरवार,मल्लिकार्जुन मठपती, सर्व ग्राम पंचायत सदस्य,बालिका पंचायत राज, आरोग्य कर्मचारी आणि गावकऱ्यांनी परिश्रम केले. प्रास्ताविक संतोष पाटील येरगीकर यांनी केल आभार बालिका पंचायत राजचे तंटामुक्त अध्यक्ष शिवकांत भुरळे,सूत्रसंचालन राजुरे सर यांनी केले.

# नेरे जिल्हा परिषद राखीव गटात गणपत वारगडा इच्छुक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : स्थानिक स्वराज्य संस्थेने २०२५-२६ रोजी घातलेल्या निवडणूकांमध्ये नेरे जिल्हा परिषद गटामध्ये अनुसूचित जमाती राखीव जागा पडल्याने अनेकांची गोची झाली आहे. असे असले तरी नेरे विभागातील आदिवासी समाजाचे कार्यकर्ते, पत्रकार गणपत वारगडा यांनी नेरे जिल्हा परिषद राखीव गटामध्ये निवडणूक लढवण्याची तयारी दाखवली आहे.



गणपत वारगडा हे गेल्या १८ वर्षांपासून सामाजिक, पत्रकारिता आणि राजकीय क्षेत्रात काम करत आलेले आहेत. ते सुशिक्षित असून त्यांच शिक्षण बी.ए. पदवी (Political Science), कृषी पदविका घेत संगणकीय अभ्यास झालेला आहे. गणपत वारगडा यांच शिक्षण आदिवासी आश्रमशाळा ते वसतिगृहमध्ये झाल्याने ते संघर्षातून पुढे आले. त्यामुळे त्यांना समाजाची जाण आहे. अनेक आदिवासी बांधवांना जातीचे दाखले, रेशनिंग कार्ड, वनपट्टे देणे, जमिनीचे प्रश्न सोडवणे, आदिवासी विध्यार्थ्यांना आश्रमशाळा, इंग्लिश नामांकित शाळा, वसतिगृहामध्ये प्रवेश देण्याचे काम केले आहे. समाज संघटन वाढविण्यासाठी आदिवासी सेवा संघ नावाची स्थापना करत अनेक सामाजिक संस्था- संघटनेत सामाजिक कार्यात सक्रिय आहे. आदिवासी समाजाबरोबर इतर समाजात देखील चांगला जनसंपर्क जोडला गेला आहे. याची दखल घेत महाराष्ट्र विधानसभा माजी अध्यक्ष, माजी आदिवासी विकास मंत्री, पनवेल नगर परिषदसह अनेकांनी पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

२००९ ला प्रशांत रामशेठ ठाकूर हे काँग्रेसमधून विधानसभा निवडणूकीला उभे राहिले, त्यावेळी नेरे येथील सभागृहामध्ये झालेल्या प्रचार सभेमध्ये वांगणी तर्फे वाजे जि.प. विभागीय संघटक म्हणून पदावर नेमणूक केली. आणि प्रशांत ठाकूर यांच्या विजयामध्ये खारीचा वाटा उचलण्यात यशस्वी झाले. त्यावेळी ग्रामीण भागात शेकाप आणि काँग्रेस असा खूप मोठा संघर्षाचा काळ होता. नंतर २०१४ साली स्थानिकांना खारघर टोल नाक्यावर सुट मिळावी म्हणून त्या आंदोलनात सक्रिय होते. टोल नाक्यावर स्थानिकांना सुट मिळत नसल्याने माजी खासदार रामशेठ ठाकूर, आ. प्रशांत ठाकूर यांच्या भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करण्याच्या निर्णयासोबत ते राहिले.

२०२३-२४ च्या मालडुंगे ग्रामपंचायतीच्या निवडणूकीमध्ये भाजपप्रणित असलेल्या गणपत वारगडा यांच्या पत्नी उषा गणपत वारगडा या शेकडो मतांनी निवडून आल्या. २०२५ मध्ये भारतीय जनता पक्ष सदस्य नोंदणी उपक्रमांमध्ये सक्रिय भाग घेऊन सभासद देखील नोंदणी केली असल्याचे बोलले जात आहे.

# ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात ‘हेल्मेट मॅन ऑफ इंडिया’ यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना हेल्मेट वाटप

## हेल्मेट वापरासाठी समाजात व्यापक जनजागृती आवश्यकजिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

**दैनिक युवक आधार**
**ठाणे,प्रतिनिधी** : रस्ते अपघातांत मृत्यू पावणाऱ्यांमध्ये तरुणांचा वाढता सहभाग चिंताजनक असून त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी हेल्मेट वापराविषयी समाजात मोठ्या प्रमाणावर जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले. ठाणे जिल्हाधिकारी आवारातील जिल्हा नियोजन भवनातील सभागृहात चित्रमेध व्हिजन आणि जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय, पोलीस विभाग, उपप्रादेशिक परिवहन विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हेल्मेट वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाला ‘हेल्मेट मॅन ऑफ इंडिया’ म्हणून परिचित असलेले श्री. राघवेंद्र कुमार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तसेच कल्याण-




डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल, उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त मनिषा आव्हाळे, भिवंडी महानगरपालिका आयुक्त अनमोल सागर, लेफ्टनंट कर्नल विवेक तिवारी, आयटी तज्ञ पवन द्विवेदी, लेफ्टनंट कर्नल मोहित गौर (निवृत्त), जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, चित्रमेध व्हिजनचे आयोजक बबन लाटे व विशाल लाटे यांच्यासह मोठ्या संख्येने ठाणे पोलीस स्कूलचे प्राथमिक विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

या उपक्रमाचे कौतुक करताना जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले, “ठाण्यात लहान मुलांना हेल्मेट वाटपाचा असा उपक्रम प्रथमच राबविला जात आहे, ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे.सर्वसाधारणपणे १८ वर्षांनंतर वाहन चालविण्यास पात्र झाल्यावर तरुणांमध्ये हेल्मेटचा वापर वाढतो. परंतु राघवेंद्र कुमार यांनी मांडलेली ‘लहानपणापासून हेल्मेटची सवय’ ही संकल्पना मुलांमध्ये सुरक्षिततेची जाण निर्माण करणारी आहे. आज मुलांमध्ये जागरूकता निर्माण झाली, तर भविष्यात ते स्वतः हेल्मेटचा योग्य वापर करतील आणि समाजातही त्याचा प्रसार करतील.”

रस्ते अपघातातील मृत्यूचे वाढते प्रमाण गंभीर असून हेल्मेटचाच वापर हे त्यावरील सर्वात सोपे व प्रभावी उपाय आहे, असेही त्यांनी नमूद केले. तसेच राघवेंद्र कुमार यांच्या २ लाख हेल्मेट वितरण मोहिमेची प्रशंसा करत त्यांना शुभेच्छाही दिल्या.

कार्यक्रमात हेल्मेट घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी घरी गेल्यावर आपल्या पालकांना आणि नातेवाईकांना हेल्मेट न घालण्याचे धोके आणि वापराचे महत्त्व समजावून सांगावे, तसेच विनाहेल्मेट दिसणाऱ्या व्यक्तींना योग्य मार्गदर्शन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी विद्यार्थ्यांना केले.

राघवेंद्र कुमार यांनी या उपक्रमाचा उगम कसा झाला, तसेच हेल्मेट वापराचा प्रसार करण्यामागील अनुभव सांगितला. ते म्हणाले, “लहानपणापासून मुलांना हेल्मेटची सवय लावली, तर ते मोठे झाल्यावर कोणतेही वाहन कधीच विनाहेल्मेट चालवणार नाहीत. त्यामुळे भविष्यातील अपघाती मृत्यूचे प्रमाण निश्चितच कमी होईल.”

या कार्यक्रमात जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी वीर शहीद कॅप्टन विनायक गोरे यांच्या जीवनावरील प्रसंगावर देशप्रेमावर आधारित एकपात्री एकांकिका सादर केली. या सादरीकरणातून विद्यार्थ्यांना देशभक्तीचा प्रभावी संदेश देण्यात आला.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांना प्रतिकात्मकरित्या हेल्मेट देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदक पटकविलेल्या शौर्या अंबुरे या विद्यार्थीनीचा जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# विंचूर ग्रामस्थांचा संताप उसळला; मंडळ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षाविरोधात एसडीओकडे लेखी तक्रार

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**
**विंचूर (ता. निफाड) :** तालुक्यातील मंडळ अधिकाऱ्यांच्या निष्काळजी व दुर्लक्षपूर्ण कार्यपद्धतीविरुद्ध विंचूर ग्रामस्थांचा रोष अखेर उफाळून आला असून नागरिक संतोष मुरलीधर उशीर यांनी उपविभागीय अधिकारी (एसडीओ) यांच्याकडे औपचारिक तक्रार दाखल केली आहे.

या तक्रारीला विंचूर, देवगाव, नांदूरमधमेश्वर, लासलगाव परिसरातील ग्रामस्थांनीही समर्थन दिले आहे.

तक्रारीत नमूद केले आहे की, विंचूर हे २०–२५ गावांचे केंद्रस्थान असून कृषी, शैक्षणिक, व्यापारी व सहकारी संस्थांशी संबंधित अनेक शासकीय-अशासकीय कामांसाठी नागरिक येथे येतात.

मात्र संबंधित मंडळ अधिकारी केवळ विंचूर गावातील कामांना प्राधान्य देतात, तर इतर गावातील नागरिकांच्या अर्जांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

नावनोंदणी, सातबारा उतारे, नकाशे, प्रमाणपत्रे, महसूल नोंदी, प्रकरणांचा पाठपुरावा अशा अत्यावश्यक सेवांसाठी नागरिकांना वारंवार कार्यालयात फेरफटका मारावा लागत असून अधिकारी अनेकदा कार्यालयात गैरहजर असल्याने कामे महिनोनमहिने प्रलंबित राहतात, असे अर्जदाराने म्हटले आहे.

तक्रारीत पुढे नमूद केले आहे की, देवगाव, नांदूरमधमेश्वर, लासलगाव परिसरातील शेकडो नागरिकांचे अर्ज दिवसभर हाताळले जात नाहीत.

महसूल विभागाकडून अपेक्षित असलेली तत्परता नसल्याने ग्रामीण भागातील लोकांच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होत आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर तत्काळ चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी उशीर यांनी केली आहे.

> “मंडळ अधिकारी कधीही वेळेवर कार्यालयात नसतात; आमची कामे प्रलंबितच राहतात.”“फक्त विंचूर कक्षेतीलच कामे केली जातात; इतर गावांकडे दुर्लक्ष होते.”
> ग्रामस्थ : संतोष मुरलीधर उशीर

या तक्रारीस मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांनी स्वाक्षरी करून समर्थन दिले असून लवकरात लवकर योग्य पावले उचलली नाहीत तर पुढील आंदोलनात्मक भूमिका घेण्याचा इशाराही काही ग्रामस्थांनी दिला आहे.

# नेरे विभागात दोन नवीन बस थांब्यांचे लोकार्पण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल तालुक्यातील नेरे विभागात दोन नवीन बस थांब्यांचा लोकार्पण सोहळा शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या हस्ते पार पडला.

शिवसेनेचे पनवेल तालुका संघटक दिनेश मांडवकर, उप तालुका प्रमुख दुंदरे ग्रामपंचायत सदस्य विश्वास पाटील, नेरा विभाग प्रमुख विद्याधर चोरघे यांच्या पाठपुराव्यातून शांतीवन, नॅचरल होम सोसायटी नेरे या दोन ठिकाणी दोन नवीन बस थांबे बांधण्यात आले. नेरे येथील कार्यक्रमादरम्यान



अनेक कार्यकर्त्यांचा शिवसेनेत पक्ष प्रवेश करण्यात आला. यावेळी पनवेल तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे, बाळासाहेब पगारे, कैलास माळी, राकेश भोईर, प्रशांत कदम, प्रणव कारखानीस, सुकेश भोपी, अनिल निंबाळकर, सुरज कर्णूक, सुप्रिया मांडवकर यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

# शिरवाडे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सात वर्गांना अवघे तीनच शिक्षक

## मंजूर पदे तातडीने न भरल्यास शाळेला कुलूप लावण्याचा पालकांचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**
**शिरवाडे वाकद:-** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षकांच्या तुटवड्याचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे मंजूर पदे तातडीने न भरल्यास शाळेला कुलूप लावण्याचा पालकांनी इशारा दिला आहे.

या शाळेत एकूण चार उपशिक्षक, दोन पदवीधर शिक्षक आणि एक मुख्याध्यापक अशी सात पदे मंजूर आहेत.



मात्र, प्रत्यक्षात केवळ तीनच शिक्षकांवर सात वर्गांचा संपूर्ण कारभार चालत आहे. इयत्ता पहिली ते पाचवीत १९७ विद्यार्थी असून या वर्गांसाठी पटाधारीत चार शिक्षक आवश्यक आहेत; मात्र सध्या तीनच शिक्षक कार्यरत आहेत. इयत्ता पाचवी व सहावीचा एकूण ५८ पट असून या दोन वर्गांसाठी दोन पदवीधर शिक्षक आवश्यक आहेत, मात्र सध्या एकही पदवीधर शिक्षक नाही.

सन २०१९ पासून शाळेत भाषा पदवीधर शिक्षकच नाही, तर गणित पदवीधर शिक्षक मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त कारभार पाहत गणित शिकवत होते. त्यांच्या बदलीनंतर आता गणित शिक्षकही नसल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. काही दिवसांपूर्वी शाळेला मुख्याध्यापक नेमण्यात आले होते, मात्र त्यांनी केवळ आठच दिवसांत बदली करून घेतली.

या शाळेत तब्बल १८ विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नाही. त्यामुळे त्यांची सरळ पोर्टलवर नोंद होत नाही. त्यामुळे ते विद्यार्थी ‘बोगस’ ठरले आहेत. परिणामी विद्यार्थी संख्या कमी दिसत असल्याने शिक्षक संख्येत अजून कपात झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे तातडीने मंजूर पदे भरावीत, अन्यथा शाळेला कुलूप लावण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असा ठाम इशारा पालकांनी शिक्षण विभागाला दिला आहे.

# चंदू काका सराफ यांच्यातर्फे आयोजित फँशन शो २०२५ मोठ्या दिमाखात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर** : पनवेल मध्ये संपन्न झालेल्या चंदू काका सराफ यांच्यातर्फे आयोजित फँशन शो २०२५ मोठ्या दिमाखात पार पडला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध अभिनेत्री कोमल शेटे उपस्थित होत्या त्यांच्या हस्ते त्यांच्या विवाह तस्मै या सेगमेंट चे आणि संपूर्ण कार्यक्रमाचे उदघाटन झाले, या प्रसंगी चंदू काका सराफ पनवेल शाखेचे व्यवस्थापक अमेय जोशी, सहव्यवस्थापक योगिता चोगले ह्या कार्यक्रमाचे व्यवस्थापन करणारे मंदार काणे एंटरटेनमेंट चे मंदार प्रमोद काणे, कोरिओग्राफर शुभांगी खैरे ,तसेच उपस्थित मान्यवर आणि रसिकप्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याचसोबत सुप्रसिद्ध अभिनेत्री कोमल शेटे यांना शाल नारळ आणि सुंदर असे चंदू काका सराफ यांच्यातर्फे गिफ्ट देऊन सन्मानित करण्यात आले.

फँशन शो च्या परीक्षक स्वाती सोनावणे



,कोरिओग्राफर शुभांगी खैरे यांना ट्रॉफी आणि चंदू काका सराफ यांच्यातर्फे गिफ्ट देऊन सन्मानित करण्यात आले तसेच या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून इंस्टाग्राम क्रिएटर प्रणया साळवी , सौरभ भोईर ,लागू बंधू २०२५ ची विजेती कुमारी अक्षता शिर्के या सर्वांना ट्रॉफी आणि चंदू काका सराफ यांच्यातर्फे गिफ्ट देऊन सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमामध्ये मिसेस २०२५ च्या विजेत्या सौ प्रज्ञा इंगळे ,मिसेस २०२५ च्या विजेत्या कुमारी मयुरी हुडेर या दोघीनांही खूप सुंदर असा क्राऊन ,साश ,ट्रॉफी आणि चंदू काका सराफ यांच्यातर्फे गिफ्ट देऊन सन्मानित करण्यात आले त्याचसोबत मिसेस मध्ये द्वितीय क्रमांक सौ श्रुती सावंत आणि मिसेस मध्ये पहिला क्रमांक क्रांती पटेल यांनी मिळवला या दोघींना खूप सुंदर असा क्राऊन ,साश ,ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले तसेच मिस मध्ये द्वितीय क्रमांक साक्षी आणि मिस मध्ये पहिला क्रमांक वैष्णवी दलाल यांनी मिळवला या दोघींना खूप सुंदर असा क्राऊन ,साश ,ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले . सहभागी सर्वांना ट्रॉफी देण्यात आली या कार्यक्रमाचे संपूर्ण परीक्षण सौ स्वाती सोनावणे यांनी केले तर सूत्रसंचालन कोमल डांगे यांनी केले . या कार्यक्रमाला उद्योजिका सौ साक्षी खेडेकर याना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले सोबत मेकअप आर्टिस्ट अक्षता लांगोटे आणि चारू सर्पे यांना सुद्धा ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. पुन्हा एकदा मंदार काणे एंटरटेनमेंट ला हा कार्यक्रम करण्याची संधी दिल्याबद्दल चंदू काका सराफ यांच्या संपूर्ण परिवाराचे मनापासून आभार !!! सर्व मॉडेल्स ना कपडे प्रतिभा सिंग या डिसायनर नि दिले होते.

# डोंगराळे येथील ४ वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या कठोर शिक्षा देण्यात यावी

## सराफा व सुवर्णकार असोसिएशन चे तहसीलदार ठाणेदारांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**रणजितसिह ठाकूर । रिसोड :** मौजे डोंगराळ तालुका मालेगाव जिल्हा नाशिक येथील चार वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या नर-धामास कठोर शिक्षा देण्यात यावी जेणेकरून पुढे असे घटनेला आळा बसेल अशी मागणी रिसोड येथील सराफा असोसिएशनच्या वतीने तहसीलदार व ठाणेदार यांना दिलेल्या निवेदनात केली आहे निवेदनात नमूद करण्यात आले आहे की , दिनांक १६/११/२०२५ रोजी मौजे डोंगराळे ता.मालेगांव जि.नाशिक येथील ४ वर्षाच्या चिमुकलीवर २४ वर्षाच्या विजय खैरनार या नराधमाने बलात्कार करुन तिची निर्घून हत्या केली. या घटनेमुळे अखखा महाराष्ट्र हादरुन गेला असुन सदर चिमुकलीला व परिवाराला न्याय मिळावा व सदर नराधम विजय खैरनार याचा फास्टट्रॅक कोर्टामध्ये खटला चालून त्याला लवकरात लवकर




फाशीची शिक्षा देण्यात यावी. जेणे करुन सदर पिडीत चिमुकलीच्या परिवाराला न्याय मिळेल अशी मागणी रिसोड सराफा व सुवर्णकार असोसिएशन व समस्त हिंदू समाजाच्यावतीने सदर घटनेचा निषेद जाहिर करण्यात येत आहे. निवेदन देताना सराफा असोसिएशन चे पदाधिकारी सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोणी यात्रेवर राहणार सीसीटीव्हीची करडी नजर

**दैनिक युवक आधार**
**रणजितसिह ठाकूर । रिसोड** : वाशिम जिल्यातील विदर्भ व मराठवाडा साठी प्रसिद्ध असलेले रिसोड तालुक्यातील श्री संत सखाराम महाराज लोणी यांच्या 147 व्या पुण्यतिथी निमीत्ताने यात्रोत्सव 19,20 नोव्हेबर रोजी कार्तीक वद्य अमावस्यापासुन प्रारंभ होत असुन यात्रा उत्सव साजरा करण्यात येत आहे.

नमुद यात्राउत्सव दरम्याण दि. 11 नोव्हेंबर रोजी नियोजन सभा संपन्न झाली असुन सदर नियोजन सभेमध्ये यात्राउत्सव दरम्याण कोणताही अनुचित प्रकार घडुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही तसेच यात्रेमध्ये सहभागी होणा-या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होवु नये याकरीता योग्य ती उपाययोजना करण्यात आल्या आहेत. श्री संत सखाराम महाराज यात्रा उत्सव दरम्याण मोठ्या प्रमाणात भाविक सहभागी होतात. त्याच्या सुरक्षिततेच्या दुष्टीकोणातुन कोणताही अनुचित प्रकार ज्यामध्ये प्रामुख्याने महीलांची छेडखाणी, चोरी इत्यादी घटना घडणार नाही यादुष्टीने संपुर्ण यात्रेत व मंदीर परीसरात ठिकठीकाणी पोलीस प्रशासन व पंचायत समीती प्रशासनाच्या माध्यमातुन CCTV कैमेरे बसविण्यात आले असुन त्यावर पोलीस प्रशासनाची करडी देखरेख आहे. तसेच येणा-या सर्व भाविकांना विशेष करुन महीलांनी आपले सोबत असलेले महान मुले सांभाळुन ठेवावेत. तसेच महीलांनी अंगावरील दागीने मौल्यवान वस्तु व वर्स ईत्यादी सुरक्षीत व सांभाळुन ठेवावे. काहीही अनुचित प्रकार निर्दशनास आल्यास 112 डायल वर किंवा



पोलीसांना माहीती द्यावी, तसेच संस्थानने दिलेलया नियमानुसार शिस्तीचे पालन करावे. संस्थेतर्फे सुद्धा स्वयंसेवक नेमले असुन ते सुद्धा मदतीला आहेत.श्री संत सखाराम महाराज पुण्यतिथी यात्राउत्सव सन 2025 चे संबंधाने पोलीस स्टेशन रिसोड येथील पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण प्रभारी अधिकारी यांचे नेत्रुत्वात कोणताही अनुचित प्रकार घडुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये व यात्राउत्सव आनंदाने व निर्विघ्नपणे पार पाडावा या करीता चोख पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. भाविक तसेच नागरीकांत्या मदतीसाठी पोलीस मदत केंद्र तयार करण्यात आले आहे. सदर बंदोबस्ताकरीता 7 पोलीस अधिकारी, 43 पोलीस अमंलदार, 15 महीला पोलीस अमंलदार व RCP पथक नेमण्यात आलेले आहे.

यात्राउत्सव सुरळीतपणे पार पाडवा याकरीता योग्य पोलीस बंदोबस्त नेण्यात आला असुन सदर बंदोबस्ताकरीता पोलीस प्रशासन सज्ज व सतर्क आहे. तसेच सर्व प्रशासकिय विभागाचे त्यामध्ये महसुल, पंचायत समिती, MSEB, ग्रामपंचायत अशा विभागांचे अधिकारी व कर्मचारी सुद्धा भाविकांचे मदतीसाठी हजर राहणार आहेत.

काही अप्रिय घटना घड्डु नये करीता फायर ब्रिगेड वाहनाची सुद्धा 24 तास साठी व्यवस्था करण्यात आली आहे.